सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २७३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नगरपालिका, नगर परिषदांचा निकाल आता २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार जाहीर; उद्याला मतमोजणी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

राज्यातील नगरपालिका, नगर परिषदेच्या निवडणुकीतल डावात मचाळा अजून थांबलेला नाही. नगरपालिका, नगर परिषदांचा निकाल उद्या लागणार होता. पण तो आता लांबणीवर पडला आहे. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सर्व निकाल हा २१ डिसेंबरपर्यंत जाहीर न करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच एक्झिट पोलही सध्या जाहीर न करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे उद्या मतमोजणी आणि निकाल जाहीर होणार नाही. आता निकाल २१ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर होणार आहे.

**सर्व निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी**

उद्या होणारी मतमोजणी आणि निकाल जाहीर होणार होते. पण नागपूर खंडपीठाने सर्व नगरपालिकांची मतमोजणी आणि निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर करण्याचे निर्देश नुकत्याच झालेल्या सुनावणीत देण्यात आले. पण तोपर्यंत म्हणजे २१ डिसेंबरपर्यंत आचारसंहिता कायम राहणार आहे. तर आज होणाऱ्या मतदान प्रक्रियेवर या निकालाचा कोणताही परिणाम होणार नाही असे खंडपीठाने स्पष्ट केले आहे.

**एक्झिट पोलची लगबग नाही**



राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्याविरोधात अनेक उमेदवारांनी जिल्हा न्यायालयात धाव घेतली होती. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर आल्याने २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदाच्या आणि सदस्यपदांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. आज या ठिकाणी मतदान होणार नव्हते.

पण या नगर परिषदांबाबत न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित असल्याने राज्यातील सर्व नगरपालिका, नगर परिषद निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत. अन्यथा या २४ नगर परिषदांच्या निकालावर त्याचा प्रभाव पडू शकतो, असा युक्तीवाद दाखल याचिकांमध्ये करण्यात आला होता. त्यानुसार, नागपूर खंडपीठाने सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकींचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिले. तसेच या निवडणुकीचे एक्झिट पोलही २० तारखेला निवडणूक संपल्यानंतर अर्ध्या तासाने जाहीर करता येतील असे स्पष्ट केले.

**देवेंद्र फडणवीस निवडणूक आयोगावर नाराज**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचंड नाराज झाल्याचे दिसले. घोषित केलेल्या निवडणुका पुढे ढकलल्या जात आहेत. त्याचा निकाल पुढे जातोय. हे पहिल्यांदाच असं होतंय. हे यंत्रणांचं अपयश आहे. निवडणूक आयोगाने प्रक्रियेत सुधारणा करावी. मी पहिल्यांदाच अशी निवडणूक पाहतोय. मतमोजणी पुढे ढकलणे हे मला तरी पटत नाही. हे यंत्रणांचं फेल्यूअर असल्याचे फडणवीस म्हणाले.

## निवडणूक आयोग सत्तेचा गुलाम : बाळासाहेब थोरात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अहिल्यानगर :**



मंगळवारी राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी मतदान होत आहे. परंतु काही ठिकाणी मतदान आणि मतमोजणी पुढे ढकलली आहे. दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबर होणार असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं दिलाय. यामुळं राज्यात विविध चर्चांना उधाण आलंय. यावर प्रतिक्रिया देताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी निवडणूक आयोग आणि सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

निवडणूक आयोगाचे अधिकारी उच्च आयएएस ऑफिसर आहेत. त्यांनी अनेक निवडणुका हाताळल्या आहेत. त्यांना सगळे फायदे-तोटे कसे आहेत ते सगळं माहिती आहे. असं असताना हे सगळं होऊच कसं शकतं. कोणी तरी मंत्रालयातील पीएनं कार्यक्रम बनवला आणि निवडणूक आयोगानं तो लावून टाकला. निवडणूक आयोगाला कोणाचं तरी बंधन होतं. निवडणूक आयोग आता सत्तेचा गुलाम झाला आहे, हा आरोप खरा आहे, असं म्हणत बाळासाहेब थोरात यांनी निवडणूक आयोग आणि सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

याद्यांमधील दोष दूर का होत नाहीत? : न्यायालयानं दिलेल्या निर्णयानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील नाराजी व्यक्त केली.

## मला व धनंजय मुंडेंना बहीण-भाऊ म्हणणं बंद करा पंकजा मुंडेंची प्रसारमाध्यमांना सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२बीड**



राज्यात सध्या नगर परिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडत आहे. राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये या निवडणुका पार पडत आहेत. दरम्यान, पर्यावरण मंत्री तथा भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांनी आज वेगवेगळ्या मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान प्रक्रियेची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. तेव्हा त्यांनी प्रसारमाध्यमांना सूचना केली की मी व धनंजय मुंडे राजकारणी आहोत, आमच्या कामाबाबत गंभीर आहोत, असं असताना तुम्ही आम्हाला सतत बहीण-भाऊ म्हणू नका.

पंकजा मुंडे यांनी नगर परिषदा व नगरपंचायत निवडणुकीसाठी बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी भाजपा उमेदवारांचा प्रचार केला. तर, त्यांचे बंधू तथा आमदार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते धनंजय मुंडे हे देखील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांचा प्रचार करताना दिसले. या निवडणुकीत बीडमध्ये अनेक ठिकाणी भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने युती केली आहे. या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडे म्हणाल्या, असंख्य ठिकाणी आमची युती झाली आहे. ही युती सर्व ठिकाणी विजयी होईल.

पंकजा मुंडे यांना विचारण्यात आलं की तुम्हा बहिण-भावाचं पॅनेल या निवडणुकीत उतरलं आहे. त्याबद्दल काय सांगाल? यावर त्या म्हणाल्या, तुम्ही (प्रसारमाध्यमं) आम्हाला बहीण-भाऊ म्हणणं बंद करा. आम्ही बहीण-भाऊ आहोत. मात्र, त्याआधी आम्ही गंभीर राजकारणी आहोत. धनंजय मुंडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) नेते आहेत, तर मी भारतीय जनता पार्टीत आहे. आमच्या पक्षाची युती झाली आहे. असंख्य ठिकाणी आम्ही युती केली आहे.आम्ही बहीण-भाऊ असलो तरी केवळ बहीण-भाऊ नाही. आम्ही २०-२२ वर्षे राजकारणात झोकून देऊन काम करत आहोत. आपापल्या पक्षाचे नेते आहोत. आम्ही युती केली असून निवडणुकीत एकत्र आलेलो आहोत. आम्ही एक पॅनल केलं आहे. या निवडणुकीत आमचं पॅनल जिंकेल.असेही त्या म्हणाल्या.

## नवनीत राणा पश्चिम बंगाल मध्ये जाऊन ममता बॅनर्जींना चॅलेंच करणार : नवनीत राणाच ट्विट चर्चेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**




पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे आमदार हुमायून कबीर यांनी काही दिवसांपुर्वी पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यात बाबरी मशीद बांधण्याची घोषणा केल्यानंतर त्याचे देशभरात पडसाद उमटू लागले आहेत. भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी देखील हुमायून कबीर यांच्या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

नवनीत यांनी समाज माध्यमावर 'मी पश्चिम बंगालमध्ये येत आहे, असा सूचक संदेश दिला आहे. पश्चिम बंगालला मी बांग्लादेश बनू देणार नाही. बाबरीच्या नावावर एकही विट रचली गेली, तर मी बंगालमध्ये येऊन उखडून टाकेल, मी बंगालमध्ये येत आहे', असे नवनीत राणा यांनी या संदेशात नमूद केले आहे. 'बंगाल को बांग्लादेश नहीं बनने दूंगी. बाबरी के नाम पर अगर एक भी ईंट रखी गई तो मैं बंगाल आकर उसे उखाड़ दूँगी. मैं आ रही हु बंगाल..', नवनीत राणा यांच्या या संदेशाची चर्चा रंगली आहे.

बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यात बाबरी मशीद बांधण्याची घोषणा करणारे सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे आमदार हुमायून कबीर यांनी त्यांच्या प्रक्षोभक विधानाने मोठा राजकीय वाद निर्माण केला आहे. जो कोणी बाबरी मशीद बांधण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करेल त्याला गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा कबीर यांनी दिला आहे. भाजपने यासंदर्भातील व्हिडीओ प्रसारीत केला आहे. ६ डिसेंबर रोजी मुर्शिदाबादमध्ये बाबरी मशिदीची पायाभरणी करण्याची घोषणा कबीर यांनी केली होती. समाज माध्यमांवर प्रसारीत झालेल्या एका व्हिडिओनुसार, कबीर यांनी बंगालमधील लोकसंख्येचे आकडे उद्धृत करत म्हटले आहे की, 'आम्ही सध्या येथील लोकसंख्येच्या ३७ टक्के लोकांचे प्रतिनिधित्व करतो आणि बाबरी मशीद बांधली जाईपर्यंत आम्ही ४० टक्के लोकांपर्यंत पोहोचू'.

नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान नवनीत राणा यांनी 'कटेंगे तो बटेंगे' चा नारा देतानाच बाबरी मशिदीचा मुद्दा देखील उपस्थित केला होता. या देशात बाबर जन्माला येणार नाही आणि त्याचा वारसाही राहणार नाही. पुन्हा बाबरी मशीद बांधू दिली जाणार नाही. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना माझे आवाहन आहे, की त्यांनी रामनामाचा जप सुरू करावा. महाराष्ट्रात येऊन येथील राजकीय परिस्थिती पाहावी. या देशात श्रीराम होते, श्रीराम आहेत आणि श्रीरामच राहतील, असे नवनीत राणा आपल्या भाषणात म्हणाल्या होत्या.

## महाडमध्ये शिंदेसेना अन् राष्ट्रवादीत तुफान राडा; वाहनांची तोडफोड, तटकरे-गोगावले संघर्ष पेटला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२रायगड**

जिल्ह्यातील राजकारणात सुनील तटकरे आणि भरत गोगावले यांचा संघर्ष नगरपरिषद निवडणुकीमुळे शिगेला पोहचला आहे. त्यात मतदानाच्या दिवशीच महायुतीतील शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा झाला आहे. याठिकाणी मंत्री गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले आणि राष्ट्रवादीच्या सुशांत जाबरे समर्थकांमध्ये हाणामारी झाली. शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांनी सुशांत जाबरे यांच्या वाहनाची तोडफोड केली. सुशांत जाबरे यांनी काही दिवसांपूर्वी शिंदेसेनेतून राष्ट्रवादीत प्रवेश केला होता.



महाड नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. मतदानाच्या सुरुवातीपासून काही मतदान केंद्रावर सावळा गोंधळ पाहायला मिळाला होता. ईव्हीएम मशिन बंद पडल्याने काही काळ मतदान थांबले होते. त्याच ठिकाणी विकास गोगावले समर्थक आणि राष्ट्रवादी समर्थकांमध्ये बाचाबाची झाली. सुशांत जाबरे यांनी शिंदेसेनेतून बाहेर पडून अजितदादांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. आज मतदानाच्या दिवशी हे आमनेसामने आले तेव्हा समर्थकांमध्ये वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की सुशांत जाबरे यांना गोगावले समर्थकांकडून मारहाण झाली. जाबरेंनी बंदूक दाखवून विकास गोगावलेंना धमकावल्याचेही बोलले जात आहे.

याबाबत सुनील तटकरे म्हणाले की, निवडणुकीत शांतता राहणे सर्वच राजकीय पक्षांचे कर्तव्य आहे. मात्र तिथले युवा नेते म्हणवणारे आज सकाळपासून प्रत्येक मतदान केंद्रावर स्वत: आत जात होते. तिथे निवडणूक अधिकाऱ्यांशी हुज्जत घालत होते. लोकशाहीत हे चुकीचे आहे. मतदान केंद्रावर जाण्याचा अधिकार हा अधिकृत उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यांच्यापुरता मर्यादित असतो. इतरांना तिथे प्रवेश नसतो. मात्र तरीही महाडसारख्या सुसंस्कृत शहरात अशी गुंडगिरी होतेय, धमकावणे हे संविधानाच्या विरोधात आहे. प्रशासनाने योग्य ती कारवाई केली पाहिजे असं त्यांनी म्हटलं.

तसेच जेव्हा पायाखालची वाळू सरकते तेव्हा माणसं या प्रवृत्तीकडे वळतात. ज्यांची प्रवृत्ती गुन्हेगारीची आहे त्यांच्याकडून वेगळ्या अपेक्षा काय करणार, प्रशासनाने खबरदारी घेणे आवश्यक होते.

## निलेश राणे निवडणूक अधिकाऱ्यांसह पोलिसांना कोर्टात खेचणार; जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीनंतर इशारा



**विदर्भ प्रजसात्ताक दि.२मालवण (सिंधुदुर्ग)**

नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी आज राज्यभरात मतदान सुरु आहे. अनेक ठिकाणी बोगस मतदार पकडले जात आहेत. काल (सोमवार) रात्री मालवणमध्ये पैसे वाटप करताना भाजप कार्यकर्त्यांना पोलिसांनी पकडले, त्यांची वाहने जप्त करण्यात आली. मात्र त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही, असे सांगत शिवसेना (शिंदे) आमदार निलेश राणे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे दाद मागितली. तिथेही निराशा हाती लागल्यानंतर आता त्यांनी सर्व संबंधितांना कोर्टात खेचणार असल्याचा इशारा दिला आहे.


मालवण नगरपरिषद निवडणूक सध्या राज्यात चर्चेतील निवडणूक झाली आहे. मालवण पोलिसांनी काल प्रचार संपल्यानंतर नाकाबंदीमध्ये भाजपचे काही पदाधिकारी आणि एका कारमध्ये रोख रक्कम पकडली. त्यांच्यावर कारवाईची मागणी आमदार निलेश राणे यांनी केली. पहाटे पाच वाजतापर्यंत पोलीस स्टेशनमध्ये ठिय्या देऊनही पैसे सापडलेली कार, कारचे मालक आणि त्यांना सोडवण्यासाठी विना नंबर प्लेटची कार घेऊन आलेल्या भाजप पदाधिकाऱ्यांवर ठोस कारवाई करण्यात आली नाही. ते सर्व मोकाट फिरत असल्याचे सांगत आमदार निलेश राणे यांनी जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांची भेट घेऊन कारवाईची मागणी केली. तुम्ही कारवाई करणार नसला तर नाईलाजास्तव मला तुमच्याविरोधात कोर्टात जावे लागेल असा इशारा आमदार राणे यांनी दिला.

## ऑपरेशन सिंदूर आजही सुरूच, सर्व काही सार्वजनिक करता येत नाही

### पाकिस्तानची झोप उडालीये! नौदल प्रमुखांचे मोठे वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नवी दिल्ली**

भारतीय नौदलाचे प्रमुख डमिरल दिनेश त्रिपाठी यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत केलेल्या वक्तव्यामुळं पाकिस्तानची झोप उडण्याची शक्यता आहे. डमिरल त्रिपाठी यांनी ऑपरेशन सिंदूर आज देखील सुरू आहे. सर्व काही सार्वजनिक करता येत नाही असं वक्तव्य केलं. यामुळं अरबी समुद्रात काही घडामोडी आजही घडत आहेत का अशी चर्चा सुरू झाली आहे.




मे महिन्यात पहलगाम दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारतानं ऑपरेशन सिंदूर लाँच केलं. त्यानंतर भारतीय नौदलानं अरबी समुद्रात आपला आयएनएस विक्रांतसह कॅरिअर बॅटल ग्रुप आक्रमक स्थितीत तैनात केला. या स्ट्रॅटजीमुळं पाकिस्तानला आपल्या युद्धनौका बाहेर काढण्याची संधीच मिळाली नाही.

पाकिस्तानच्या युद्धनौका या कराची ग्वादर बंदाराच्या आताच अडकून पडल्या. डमिरल तिवारी यांनी आमच्या या आक्रमक पवित्र्यामुळं पाकिस्तानचं खूप मोठं नुकसान झाल्याचं तिवारी यांनी सांगितलं. त्यांनी गेल्या सात महिन्यापासून भारतीय नौदल उत्तर अरबी समुद्रात सातत्यानं हाय टेम्पो ऑपरेशन राबवत आहे असंही सांगितलं.दरम्यान, मन की बातमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सागरी सुरक्षा आणि नौदलाच्या क्षमतेचा खास उल्लेख केला होता. याबद्दल डमिरल त्रिपाठी यांनी पंतप्रधान मोदींचे आभार देखील मानले. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिवाळी आएनएस विक्रांतवर साजरी केली. त्यांनी नौदलाच्या विविध अंगी क्षमतांची जवळून पाहणी केली.

## संपादकीय ......

# 'जीडीपी'ची घोडदौड!

जगद्विख्यात अर्थशास्त्रज्ञ जगदीश भगवती यांनी एकविसावे शतक हे भारतीय शतक असू शकते, असा विश्वास सातत्याने व्यक्त केला आहे. पूर्वीच्या काळात जागतिक बँक भारताला सल्ला देत असे. कोणती पावले उचलावीत, याचे मार्गदर्शन करत असे; परंतु आता तुम्ही काय करायला हवे आहे, हे भारतच जागतिक बँकेला सुचवतो. देश अत्यंत योग्य दिशेने चालला आहे, अशी प्रशंसा भगवती यांनी केली होती. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आऊटलुक'मध्ये ऑक्टोबरच्या अहवालात २०२५ मध्ये जागतिक विकास दर ३.३ वरून ३.२ व आणि २०२६ मध्ये ३.१ वर येण्याची शक्यता वर्तवली आहे.प्रगत देशांमधील सकल राष्ट्रीय उत्पादन म्हणजेच जीडीपीवाढीचा दर हा चालू वर्षात ०.२ टक्के घसरण्याची चिन्हे आहेत; परंतु उदयोन्मुख बाजारपेठा आणि विकसनशील अर्थव्यवस्था यांच्या वाढीचा वेग २०२४ मध्ये ४.३ टक्के होता. तो २०२५ मध्ये ४.२ टक्के असणार आहे. याचा अर्थ, अत्यंत विकसित झालेल्या अर्थव्यवस्थांपेक्षा उदयोन्मुख देशांच्या प्रगतीचा वेग अधिक आहे आणि या देशांमध्येदेखील भारताची कामगिरी तेजस्वी आहे. सरलेल्या जुलै ते सप्टेंबर या तिमाही कालावधीत भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर अर्थतज्ज्ञांच्या अनुमानाच्या तुलनेत सरस ठरला आहे. अर्थव्यवस्था ८.२ टक्क्यांच्या भरधाव वेगाने घोडदौड करत आहे.

जगद्विख्यात अर्थशास्त्रज्ञ जगदीश भगवती यांनी एकविसावे शतक हे भारतीय शतक असू शकते, असा विश्वास सातत्याने व्यक्त केला आहे. पूर्वीच्या काळात जागतिक बँक भारताला सल्ला देत असे. कोणती पावले उचलावीत, याचे मार्गदर्शन करत असे; परंतु आता तुम्ही काय करायला हवे आहे, हे भारतच जागतिक बँकेला सुचवतो. देश अत्यंत योग्य दिशेने चालला आहे, अशी प्रशंसा भगवती यांनी केली होती. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आऊटलुक'मध्ये ऑक्टोबरच्या अहवालात २०२५ मध्ये जागतिक विकास दर ३.३ वरून ३.२ व आणि २०२६ मध्ये ३.१ वर येण्याची शक्यता वर्तवली आहे.

प्रगत देशांमधील सकल राष्ट्रीय उत्पादन म्हणजेच जीडीपीवाढीचा दर हा चालू वर्षात ०.२ टक्के घसरण्याची चिन्हे आहेत; परंतु उदयोन्मुख बाजारपेठा आणि विकसनशील अर्थव्यवस्था यांच्या वाढीचा वेग २०२४ मध्ये ४.३ टक्के होता. तो २०२५ मध्ये ४.२ टक्के असणार आहे. याचा अर्थ, अत्यंत विकसित झालेल्या अर्थव्यवस्थांपेक्षा उदयोन्मुख देशांच्या प्रगतीचा वेग अधिक आहे आणि या देशांमध्येदेखील भारताची कामगिरी तेजस्वी आहे. सरलेल्या जुलै ते सप्टेंबर या तिमाही कालावधीत भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर अर्थतज्ज्ञांच्या अनुमानाच्या तुलनेत सरस ठरला आहे. अर्थव्यवस्था ८.२ टक्क्यांच्या भरधाव वेगाने घोडदौड करत आहे. ताज्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत जीडीपीवाढीचा दर ७.८ टक्के होता, तर यंदाच्या दुसर्या तिमाहीत ८.२ टक्क्यांपर्यंत मजल मारली. वर्षभरापूर्वीच्या जुलै ते सप्टेंबर या दुसर्या तिमाहीत हा दर फक्त ५.६ टक्के होता. म्हणजे सरलेल्या तिमाहीत मागील सहा महिन्यांतील तिमाहींमधील उच्चांक गाठला. केंद्र सरकारची आर्थिक धोरणे परिणामकारक ठरत असल्याचेच यावरून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर २७ ऑगस्टपासून ५० टक्के शुल्कवाढ लागू केली. त्यामुळे या आकडेवारीत त्याचे प्रतिबिंब अर्थातच कमी पडले. कदाचित पुढच्या तिमाहीत त्याचा किंचित परिणाम जाणवूदेखील लागेल. त्यामुळे केवळ जल्लोषात राहून चालणार नाही.

अर्थात, दि. २२ सप्टेंबर २०२५ पासून जीएसटी कपात लागू झाली आणि त्यानंतर खर्याअर्थाने जीएसटी उत्सव सुरू झाला. याचा आणखी सकारात्मक परिणाम आगामी तिमाहीतही दिसू शकेल. एकूण जीडीपीमध्ये ५७ टक्के वाटा हा खासगी उपभोग खर्चाचा आहे. या खर्चात अगोदरच त्यात लक्षणीय वाढ झाली आहे. जेवढा लोकांचा उपभोग, म्हणजेच मागणी वर जाते, त्या प्रमाणात बाजारपेठेतील वस्तू व सेवांचा खपही वाढतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेत उत्साह संचारतो. संपलेल्या तिमाहीत सर्वात समाधानकारक भाग म्हणजे, मॅन्युफॅक्चरिंग किंवा उत्पादन क्षेत्राची झालेली ९.१ टक्के वाढ. एकीकडे अतिवृष्टी आणि महापुरामुळे यंदा शेतीचे नुकसान झाले. कृषी क्षेत्र फक्त ३.५ टक्क्यांनी वाढले. म्हणूनच उत्पादन क्षेत्रावर भरवसा होता आणि तो योग्य असल्याचे सिद्ध झाले. सेवा क्षेत्राची वाढ उत्तम आहे. सेवा क्षेत्रात लाखो लोकांना नोकर्या मिळतात. बांधकाम क्षेत्राचीही ७.६ टक्के दराने प्रगती झाली असून, तिथेही नोकर्यांचे प्रमाण लक्षणीय वाढले, ही समाधानाची बाब. अर्थव्यवस्था चालू आर्थिक वर्षात चार लाख कोटी डॉलरचा टप्पा ओलांडेल, असा विश्वास मुख्य आर्थिक सल्लागार बी. अनंत नागेश्वरन यांनी व्यक्त केला आहे. सध्या अर्थव्यवस्था ३.९ लाख कोटी डॉलरच्या सकल देशांतर्गत उत्पन्नासह जगात पाचव्या क्रमांकावर आहे. सोळाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष आणि प्रख्यात अर्थतज्ज्ञ अरविंद पानगरिया यांनी भारत २०४७ पर्यंत विकसित देश होण्याचे उद्दिष्ट गाठू शकेल, असे म्हटले आहे. सध्याचा विकास दर बघितल्यास अर्थव्यवस्था पुढील दशकात दहा लाख कोटी डॉलर्सवर जाईल. सध्या दरडोई उत्पन्न २,५७० डॉलर आहे, २०४७ पर्यंत ते १४ हजार डॉलरवर जाईल. अर्थात, त्यासाठी वार्षिक ७.३ टक्के वाढ अपेक्षित आहे. या सगळ्याचे प्रतिबिंब शेअर बाजारावर पडणे स्वाभाविक असते. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह तसेच भारताच्या रिझर्व्ह बँकेकडूनही व्याजदर कपातीची असलेली अपेक्षा आणि परदेशी गुंतवणुकीच्या वाढलेल्या प्रवाहाने सकारात्मक बनलेल्या वातावरणात गेल्या गुरुवारी सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकांनी १४ महिन्यांपूर्वी स्थापित केलेला विक्रमी उच्चांक मोडीत काढला. ई-व्यापार क्षेत्रातील दोन दिग्गज कंपन्या आता कर्ज आणि ठेवीच्या योजना आणून थेट बँकांच्या स्पर्धेत उतरल्या आहेत. व्यावसायिकांकडून कर्जाची मागणी असल्यामुळेच त्यांनी हा निर्णय घेतला असणार, हे स्पष्ट आहे. त्याचवेळी रिझर्व्ह बँकेने सप्टेंबर २०२५ मध्ये परकीय चलन बाजारात ७.९१ अब्ज डॉलरची निव्वळ विक्री केली, जी ऑगस्ट महिन्याच्या तुलनेत ०.२१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होती. रुपयाची आणखी घसरण होऊ नये, यासाठी हे करावे लागत आहे. अमेरिकेच्या शुल्कवाढीमुळे भारताच्या निर्यातीलाही फटका बसला. एका वर्षात भारताची व्यापारी तूट २६ अब्ज डॉलर्सवरून ४१ अब्ज डॉलर्सवर जाऊन पोहोचली. भरीस भर म्हणून की काय, सरलेल्या ऑक्टोबरअखेर केंद्र सरकारची वित्तीय तूट संपूर्ण वर्षाच्या उद्दिष्टाच्या ५२.६ टक्के म्हणजे एकूण सव्वाआठ लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली आहे.

मागील वर्षाच्या याच पहिल्या सात महिन्यांत वित्तीय तूट ही अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ४६.५ टक्के इतकी होती. यंदाच्या पहिल्या सात महिन्यांत केंद्र सरकारच्या खर्चाची पातळी २६ लाख कोटी रुपयांवर गेली. ही तूट विकासावर नकारात्मक परिणाम करण्याचा धोकाही आहे. उत्पन्न आणि खर्चातील तफावत म्हणजे वित्तीय तूट. सरकारला काटकसर करून या खर्चावर नियंत्रण आणावे लागेल.

# हुरड्याला सुकामेव्याचा भाव; शहरात किलोचा दर काय?

## हिवाळ्याने वाढली मागणी; हुरडा पार्त्यांसह बाजारातही उसळी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती-** हिवाळ्याची चाहूल लागताच शहरात हुरड्याचा सुगंध दरवळू लागला आहे. ज्वारी व शाळूच्या बालगुटीवर भाजून तयार होणारा हुरडा हा हंगामी परंतु लोकप्रिय खाद्य प्रकार असल्याने त्याला अचानक मागणी वाढली आहे. शहरातील बाजारात सध्या हुरडा तब्बल ३५० ते ४०० रुपये किलोपर्यंत विक्रीला असून, काही ठिकाणी त्याचा भाव सुकामेव्यालाही मागे टाकत आहे.




दरवाढीमागे विशिष्ट वाणांचीमर्यादित उपलब्धता, हवामानातील अनियमितता, हुरडा पार्त्यांची वाढती लोकप्रियता आणि वाहतूक खर्चाची वाढ ही कारणे असल्याचे उत्पादक व व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. ग्रामीण भागातून येणारा पुरवठा मर्यादित असल्याने दर आणखी वाढतील अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे.हुरड्यासोबतच हिवाळ्यात खाल्ले जाणारे लेणी, शेंगदाणे, तिखट वणी, तीळ-गुळाचे पदार्थ यांचीही शहरात आवक वाढली असून, या पदार्थांचेही दर मागील वर्षाच्या तुलनेत वाढले आहेत.हिवाळ्यात हुरड्याला मागणी वाढलीहिवाळा सुरू होताच हुरड्याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढतो. पौष्टिक, हलका आणि पचनास सोपा असल्याने शहरातील ग्राहकांकडून हुरड्याला मोठी पसंती मिळते. ग्रामीण भागातून शहरात मोठ्या प्रमाणात हुरडा आवक होत आहे.हिवाळा म्हटला की हुरडा पार्त्यांची रेलचेल ही आलंच! शहरालगतच्या फर्महाऊस, गार्डन आणि पर्यटनस्थळांवर आठवड्याच्या शेवटी लोकांच्या हुरडा पार्थ्यांना मोठी पसंती मिळत असून, बुकिंगही वाढले आहे. काही आयोजकांनी दरही वाढवले आहेत.

**शहरातील दर तब्बल ४०० रुपये किलोवर-** शहरातील विविध बाजारपेठांमध्ये हुरडा ३५० ते ४०० रुपये किलो दराने मिळत आहे. विशिष्ट गुणवैशिष्ट्य असलेल्या ज्वारी वाणांची मागणी वाढल्याने दर वाढल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. पुन्हा काही दिवसांत हुरडा बाजारात आल्यानंतर दर कमी होण्याची शक्यता आहे.




# थंडीत वाढतोय मूत्रविकाराचा धोका

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

जसे तापमान कमी होते आणि हिवाळा सुरू होतो, तसतसे मोठ्या संख्येने लोकांना मूत्रविकाराच्या समस्या उद्भवतात. हिवाळ्यात निर्जलीकरण, पाणी कमी पिणे, मूत्रमार्गाचा संसर्ग (यूटीआय), मूतखडा आणि मूत्राशयाच्या अस्वस्थतेचा धोका वाढतो.

**मूत्रमार्गाचा संसर्ग :**हा सामान्यतः हिवाळ्याच्या दिवसात होतो. कारण, या दिवसांत लोक कमी पाणी पितात, ज्यामुळे लघवीचे प्रमाण कमी होते आणि मूत्राशयात बॅक्टेरियाचे प्रमाण वाढू शकते. त्याचप्रमाणे थंड हवामानात घट्ट कपडे घातल्यानेदेखील ओलावा टिकून राहू शकतो आणि बॅक्टेरियाची वाढ होऊ शकते. याकरिता डिहायड्रेशन टाळणे आणि निरोगी जीवनशैली बाळगणे योग्य ठरते. मूतखडा : थंड हवामानामुळे शरीराला घाम कमी येतो आणि लघवी जास्त प्रमाणात होते, ज्यामुळे नकळत डिहायड्रेशन होऊ शकते. यामुळे लघवीमुळे मूतखड्याचा धोका वाढतो. मूत्रपिंडातील खड्यांमुळे जेव्हा वेदना होतात त्या असह्य असतात, म्हणूनच वेळीच वैद्यकीय मदत घेणे गरजेचे असते.

**अतिक्रियाशील मूत्राशय :**बरेचजण या समस्येचा सामना करतात. थंड हवामानामुळे मूत्राशयाचे स्नायू अधिक संवेदनशील होतात. बर्याचजणांना वारंवार लघवी करणे हे लाजिरवाणे वाटते. बरेचजण हिवाळ्यात जास्त प्रमाणात शौचालयात जाण्याची गरज भासल्याचे सांगतात, जरी द्रव पदार्थाचे सेवन जास्त प्रमाणात करत नसले, तरीही वारंवार लघवीला होते. अशा समस्या जाणवल्यास वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

पुरुषांमध्ये प्रोस्टेट समस्या: प्रोस्टेट वाढलेल्या पुरुषांना हिवाळ्यात वारंवार लघवी होणे, लघवी करताना त्रास होणे किंवा मूत्राशय रिकामे न झाल्यासारखे वाटणे यासारखी लक्षणे वाढू शकतात.




प्रत्येकाला हायड्रेटेड रहावे आणि तहान लागली नसली तरीही किमान ३ लिटर पाणी प्यावे. या शिवाय, हर्बल टी, सूप आणि अगदी कोमट पाणी पिण्याचा प्रयत्न करा. या टिप्सचे पालन केल्याने तुम्हाला शरीर हायड्रेटेड राहण्यास आणि संबंधित आरोग्य समस्या दूर ठेवण्यास मदत होऊ शकते.आहारावर लक्ष केंद्रित करावे आणि क्रॅनबेरी, लिंबूवर्गीय फळं आणि डाळिंब यांसारखी फळं निवडावीत, जी मूत्रमार्गाच्या आरोग्यास मदत करतात. मूत्रपिंडांवर ताण येतील असे खारट पदार्थ आणि प्रक्रिया केलेले पदार्थांचे सेवन टाळावे. कॅफिन आणि अल्कोहोलयुक्त पदार्थांचे सेवन टाळावे. कारण यामुळे मूत्राशयात जळजळ होऊ शकते आणि निर्जलीकरणाची शक्यता देखील वाढू शकते. योग्य स्वच्छता बाळगणे, चांगली स्वच्छता राखणे गरजेचे आहे. कोणतेही रासायनिक पदार्थ वापरू नका आणि श्वास घेण्यायोग्य अंतर्वस्त्रांचा वापर करा.

रक्ताभिसरण सुधारण्यासाठी आणि मूत्राशयाच्या चांगल्या आरोग्यासाठी व्यायाम करावा.

# लाखोंचं उत्पन्न देणारी जरबेरा फुल शेती, लागवडीपासून ते काढणीपर्यंतची संपूर्ण माहिती!

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

विविध विध सजावटीसाठी, कुंड्यामध्ये लावण्यासाठी, फुलदाणीत ठेवण्यासाठी, हिरवळीच्या मध्यावर किंवा कडेला लावण्यासाठी जरबेरा हे फुलझाड चांगले आहे. या फुलांचा उत्तम दर्जा, काढणीनंतर अधिक काळ टिकण्याची क्षमता, फुलांचे विविध आकर्षक रंग आणि आकार इत्यादी गुणधर्मांमुळे जरबेराच्या फुलांपासून हार आणि उत्कृष्ट प्रतीचे गुच्छ तयार करता येतात. या सर्व बाबींचा विचार केला असता देशांतर्गत विक्रीसाठी तसेच परदेशात फुलांची निर्यात करण्यासाठी या फुल पिकाखालील क्षेत्र वाढविण्यास बराच वाव आहे.

**हवामान-** महाराष्ट्रातील उष्ण व कोरड्या आणि समशीतोष्ण हवामानात हे पीक चांगल्या प्रकारे घेता येते. भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा व सर्वसाधारण ५०० ते ६१५ मिलीमीटर पाऊसमान या पिकाच्या वाढीसाठी योग्य असते. तर अति पाऊस, बराच मोठा काळ अती कडक थंडी व कडक उन्हाळा जरबेराच्या उत्पादनास मानवत नाही. दिवसाचे १२ ते २५ अंश सेल्सिअस तापमान, ५०-६० टक्के आर्द्रता आणि रात्रीचे १२ अंश सेल्सिअस तापमान असल्यास या फुलांचा दर्जा चांगला मिळतो.

**जमीन-** जरबेराच्या लागवडीसाठी पाण्याचा योग्य




निचरा होणारी हलकी, मध्यम काळी किंवा पोयट्याची जमीन अधिक योग्य असते. चोपण मातीच्या, चुनखडीयुक्त आणि पाण्याचा अयोग्य निचरा होणाऱ्या जमिनीत या पिकाची लागवड चांगली होत नाही. त्याचप्रमाणे भारी, काळ्या व अत्यंत सुपीक जमिनीत झाडाची केवळ पालेदार वाढ होते. आणि फुलांचे समाधानकारक उत्पादन मिळत नाही. म्हणून अशा प्रकारच्या जमिनीत जरबेराची लागवड करू नये. साधारणपणे ३०-४५ सेंटीमीटर मध्यम खोलीची काळी व ५.० ते ७.५ दरम्यान सामू असलेली जमीन जरबेराच्या लागवडीसाठी सर्वात चांगली असते. हलक्या जमिनीतही पुरेशा प्रमाणात सेंद्रिय खते घालून या पिकाची किफायतशीर लागवड करता येते.

**सुधारित जाती-** क्रीम क्लेमेंटाइन, मरोन क्लेमेंटाइन, फ्लेमिंगो, फ्रेडोरेलो, गोल्डन गेट,




ऑरनेला, कोझ्याक, गोल्ड डिस्क, मेलो डिस्क, लेडी, टोरो, स्पिंक्स, सांग्रीया, बित्राफा, लव्हली डिस्क, पसादेना, पारिजात, पालरेमो, पनामा, पामेला, पोलर, झेब्रा, विजय ट्रोपिकल, स्पायडर.

**अभिवृद्धी-**जरबेराची अभिवृद्धी बियांपासून, शाखीय पद्धतीने ऊतीसंवर्धन पद्धतीनेही जरबेराची अभिवृद्धी करता येते.

**लागवड-** जरबेराची व्यापारी तत्वावर शेतात लागवड करताना जास्त पावसाचा काळ वगळता वर्षभर केव्हाही लागवड केली तरी चालते. लागवडीपूर्वी जमीन नांगरून आणि दोनदा वखरणी करून भुसभुशीत करून घ्यावी व २०-३० टन चांगले कुजलेले शेणखत घालून ते मातीत चांगले मिसळून घ्यावे. जून महिन्यामध्ये बियांची गादीवाफ्यावर पेरणी करावी. रोपे ४-६ पानांवर आल्यानंतर शेतात पुनर्लागवड करावी. लागवड करण्यापूर्वी ४५ ते ६० सेंटीमीटर अंतरावर सऱ्या काढाव्यात आणि सरीच्या एका बाजूने ३०-४० से.मी. अंतरावर एका ठिकाणी एक फुटवा (सकर्स) लावून लागवड करावी. लागवड करतांना रोपाचा मधला वाढणारा शेंडा मातीत गाडला जाणार नाही याची काळजी घ्यावी.

**खते आणि पाणी व्यवस्थापन-** जरबेरा हे पीक सेंद्रिय खताच्या वापराला चांगल्या प्रकारे प्रतिसाद देते. त्यामुळे फुलांची चांगली प्रत व काढणीनंतर चांगला टिकाऊपणा पाहिजे असल्यास पिकाला भरपूर प्रमाणात सेंद्रिय खत देणे आवश्यक आहे. या पिकाची व्यापारीदृष्ट्या लागवड करावयाची असल्यास लागवडीपूर्वी शेतात हेक्टरी २०- ३० टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. याशिवाय लागवडीच्या वेळी हेक्टरी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश खतांची मात्रा द्यावी. ५० किलो नत्राचा दुसरा आणि तिसरा हप्ता लागवडीनंतर अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या महिन्यात द्यावा. फुलांच्या बहाराच्या वेळी प्रमाणापेक्षा जास्त पाणी दिल्यास फुलांची प्रत खराब होण्याची शक्यता असते. यासाठी जमीन व हवामान पाहून गरजेनुसार पावसाळ्यात १०-१२ दिवसांच्या अंतराने, हिवाळ्यात ८-९ दिवसांच्या अंतराने आणि उन्हाळ्यात ४-६ दिवसांच्या अंतराने पिकाला नियमित पाणी द्यावे. पिकाला ठिबक सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास पिकांची एकसमान वाढ होऊन नियमित उत्पादन मिळते.

**आंतरमशागत-** जरबेराचे पीक जास्त काळ शेतात राहत असल्यामुळे लागवडीपूर्वी शेतातील हराळी, लव्हाळा, कुंदा यासारख्या बहुवर्षायू तणांचा नाश करावा आणि त्यानंतर पिकाची लागवड करावी. लागवडीनंतर तणे उगवून आल्यास वेळोवेळी खुरपण्या करून पीक तणमुक्त ठेवावे. याशिवाय झाडांना मातीचा भर देणे, झाडाच्या बुडाखालील रोगट तसेच सुकलेली पाने काढून टाकणे यासारखी मशागतीची कामे नियमित केल्यास झाडांची वाढ चांगली होऊन उत्तम प्रतीच्या फुलांचे उत्पादन मिळते.

**फुलांची काढणी आणि उत्पादन-** जरबेराची लागवड केल्यापासून दीड ते दोन महिन्यात फुले येण्यास सुरुवात होते. फुलांची काढणी करताना फुलाच्या बाह्य बाजूस असलेल्या फुलातील परागकण परिपक्व झालेले दिसल्यास, अशी फुले जमिनीलगत छाटून घ्यावीत. फुलांची काढणी केल्यानंतर त्वरित फुलांचे दांडे २-३ तास पाण्यात बुडवून ठेवावेत.

# सर्व बाजूंचा विचार करून निवडणुका पुढे ढकलल्या:कायदेशीर पेच टाळण्यासाठी घेतला निर्णय

## निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२मुंबई-** राज्य निवडणूक आयोगाने ऐनवेळी राज्यातील २४ नगरपालिका आणि १५० सदस्यांच्या निवडणुका पुढे ढकलल्याने एकच गदारोळ उडाला आहे. मात्र, हा निर्णय का घेतला? याबाबत आता निवडणूक आयोगाने अत्यंत महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले आहे. जर निवडणुका पुढे ढकलल्या नसत्या, तर कायदेशीर तांत्रिक बाबींमुळे भविष्यात संपूर्ण निवडणूक प्रक्रियाच रद्द होण्याची भीती होती. हा मोठा धोका टाळण्यासाठीच कायदेशीर सल्ला घेऊन हा निर्णय घेणे अपरिहार्य होते, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काही उमेदवारांनी जिल्हा न्यायालयात अपील केले होते. निवडणूक नियमावलीतील तरतूद १७ (१-ब) नुसार, जेव्हा एखादा उमेदवार न्यायालयात जातो आणि निकाल येतो, तेव्हा त्या उमेदवाराला उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी किंवा चिन्ह वाटपासाठी ठराविक वैधानिक वेळ देणे कायद्याने बंधनकारक असते.

सद्यःस्थितीत न्यायालयाचे निकाल उशिरा आले. जर आम्ही निवडणुका तशाच घेतल्या असत्या, तर संबंधित उमेदवारांवर अन्याय झाला असता.

या कारणास्तव भविष्यात संपूर्ण निवडणूकच न्यायालयात अवैध ठरली असती आणि ती रद्द करावी लागली असती. अशी नामुष्की टाळण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या निर्विघ्न पार पाडण्यासाठीच, सर्व बाजूंचा विचार करून निवडणुका स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला, असे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.




निवडणूक आयोगाचा सुधारित कार्यक्रम

आता स्थगित करण्यात आलेल्या जागांसाठी आयोगाने सुधारित वेळापत्रक दिले आहे. त्यानुसार, अर्ज माघारी व चिन्ह वाटप ११ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. त्यानंतर २० डिसेंबर रोजी मतदान आणि दुसऱ्या दिवशी २१ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांना संबंधित २४ निवडणूक अधिकाऱ्यांकडून अहवाल घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

मंगळवार दि. २ डिसेंबर २०२५

शहर/ग्रामिण


# अचानक स्थगित निवडणुकीने उमेदवारांचे गणित बिघडले; प्रक्रिया नव्याने पण उमेदवार तेच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–** नगरपरिषदांच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असतानाच अंजनगाव सुर्जी नगराध्यक्षपद आणि आठ सदस्य पदांच्या निवडणुका रविवारी रात्री जिल्हाधिकाऱ्यांनी स्थगित केल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे उमेदवारांपासून निवडणूक यंत्रणेपर्यंत सर्वांवर अक्षरशः पाणी फिरले. आता आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार निवडणूक होणार असली तरी उमेदवार मात्र तेच राहतील. येथे फक्त अर्ज माघारीपासून पुढील प्रक्रिया नव्याने राबविली जाणार आहे.

अपिलार्थी उमेदवारांना अर्ज माघार घेण्यासाठी आवश्यक असणारा तीन दिवसांचा कालावधी न दिल्याने निवडणूक चिन्हवाटपाची प्रक्रिया नियमबाह्य ठरल्याचे आयोगाने म्हटले आहे. मात्र, ज्यांचे अर्ज आधीच अवैध ठरले आणि नंतर न्यायालयातही फेटाळले गेले, त्या उमेदवारांचे अर्ज माघारी कसे घेणार, असा सवाल इतर उमेदवारांनी उपस्थित केला आहे. या निर्णयाबाबत जिल्ह्यात मोठी चर्चा सुरू असून प्रक्रियेतील विसंगतीबाबत उमेदवार नाराजी व्यक्त करत आहेत.

मतदारांची होणार अतिरिक्त दगदगएका प्रभागात दोन उमेदवार उभे असल्याने 'अ' किंवा 'ब' निवडणूक स्थगित झाल्यास मतदारांना २ डिसेंबरला एकदा मतदान करून २० डिसेंबरला पुन्हा मतदान करावे लागणार आहे. दोन वेगळ्या दिवशी मतदान झाल्याने मतदारांच्या दोन वेगवेगळ्या बोटांना शाई लागणार असून त्यासाठीचे नियोजन प्रशासन करणार आहे.



स्थगितीमागे सत्ताधाऱ्यांचे षडयंत्र?अंजनगाव सुर्जी नगराध्यक्षपदाचा व दर्यापूर प्रभाग २(अ) येथील सदस्यपदाचा एक उमेदवार यांचे अर्ज अपिलात स्वीकारले गेले. अर्ज बाद झाल्यामुळेच त्यांनी अपील केले होते, म्हणून ते अर्ज माघारी घेणार नाहीत. अशावेळी संपूर्ण निवडणूक स्थगित करणे हे सत्ताधाऱ्यांचे षडयंत्र असल्याचा आरोप प्रतिस्पर्धी उमेदवारांनी केला आहे. राजकीय वर्तुळातही यावरून तापमान वाढले आहे.

उमेदवारांवर खर्चाचा भुर्दंडपंधरा दिवसांपासून प्रचाराची धडाकेबाज रणधुमाळी सुरू होती. पक्षीय तसेच अपक्ष उमेदवारांनी सभा, रॅली, कॉर्नर मीटिंग्सद्वारे जोरदार प्रचार केला. मतदान अवघे ४८ तासांवर असताना स्थगितीमुळे सर्वांचा हिरमोड झाला असून आता पुन्हा प्रचार, कार्यकर्त्यांना सांभाळणे, वाहतूक-प्रसार खर्च यामुळे आर्थिक भुर्दंड बसणार आहे. त्यामुळे खर्चाची मर्यादा वाढवण्याची मागणी केली जात आहे.

तारीख नवी, संधी मात्र नव्या उमेदवारांना नाहीसुधारित कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज छाननीपासून पुढील सर्व तारीखा नव्याने दिल्या असल्या तरी उमेदवार मात्र बदलणार नाहीत. त्यामुळे नव्या इच्छुकांना संधीच उपलब्ध नाही. उमेदवारांना प्रचारासाठी अधिक वेळ मिळणार असला तरी निवडणूक आयोगाच्या खर्च मर्यादेत राहून प्रचार करणे मोठे आव्हान ठरणार आहे. परिणामी सर्वसामान्य उमेदवारांसाठी हि निवडणूक अधिक कठीण होत चालली आहे.

# अमरावती-बडनेरा रोडवरील बेफिकीर कामामुळे दुर्दैवी अपघात

## दोन निष्पाप जीव गेले-शिवसेनेचा पीडब्ल्यूडी, ठढज व ट्रॅफिक पोलिसांना जाब



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती :** ९अमरावती-बडनेरा रोडवरील हलगर्जीपणे केलेल्या कामामुळे दोन निष्पाप व्यक्तींचा बळी गेल्याचा गंभीर आरोप करत शिवसेनेतर्फे सार्वजनिक बांधकाम विभाग, आरटीओ आणि ट्रॅफिक पोलिसांना आज निवेदन देण्यात आले. दत्त मंदिर-कुंभारवाडा-बजरंग चौक अबागेट परिसरात रस्त्याच्या पॅचवर्कदरम्यान रपट्याची उंची एक ते दीड फूट तफावत ठेवून कोणतीही चेतावणी फलक, झेब्रा क्रॉसिंग वा सुरक्षा व्यवस्था न लावता काम केल्याचा आरोप करण्यात आला.

या धोकादायक रपट्यावरून वाहन उसळून नियंत्रण सुटल्याने घडलेला अपघात हा अपघात नसून विभागाच्या हलगर्जीपणामुळे झालेली थेट हत्या असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला. विशेष म्हणजे, अपघातानंतर दुसऱ्याच दिवशी डांबरीकरण करून त्रुटी लपवण्याचा प्रयत्न झाला, अशीही तक्रार आहे.या संदर्भात सविस्तर पडताळणी करून दोषींवर कारवाई करावी, मृतक कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा तसेच त्या ठिकाणी तातडीने सुरक्षा फलक व योग्य रस्ता दुरुस्ती करावी, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. अन्यथा उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.निवेदन स्विकारताना कार्यकारी अभियंत्यांनी, एक ते दोन दिवसांत मी स्वतः, ट्रॅफिक विभाग व आरटीओ अधिकाऱ्यांसह घटनास्थळी पाहणी करून योग्य कारवाई करु, असे आश्वासन दिले.निवेदन देताना शिवसेना शहरप्रमुख प्रवीण हरमकर, उपशहरप्रमुख विजय ठाकरे, संजय गव्हाणे, आनंद शेळके, बाबुराव तायवाडे, विजय मंडाळकर, संजय इंगोले, श्रीकांत शर्मा, जुगल दवे, गोविंदा दारणा, कमलेश गुप्ता, निकेश शर्मा, प्रवीण केशरवाणी, अजय बोबडे, रामा सोळंके, प्रमोद वानखडे, सुलतान शहा, असलम खान, बाळा सावरकर, सागर डोके यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.–

# मतदार यादी दुरुस्त करा– प्रा. डॉ .हेमंत देशमुख

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–** अमरावती महानगर पालिका अंतर्गत विविध प्रभाग, वार्डातील मतदार यादी मध्ये मोठ्या प्रमाणात घोळ झाल्यामुळे या याद्या दुरुस्त करून पुन्हा नव्याने सादर कराव्यात, अशा मागणीचे निवेदन आज राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाच्या वतीने मनपा निवडणूक अधिकाऱ्याला देण्यात आले.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा .डॉ.हेमंत देशमुख यांच्या नेतृत्वात देण्यात आलेल्या



निवेदनात नमूद करण्यात आले आहे, की अमरावती महानगरपालिका निवडणूक संदर्भातील प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदार यादीत मोठ्या प्रमाणात घोळ आहे. एका प्रभागातील नावे दुसऱ्या प्रभागात नमूद करण्यात आले असून त्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सुयोग कॉलनी, विद्या कॉलनी, संयुक्त हॉस्पिटल, कोर्ट परिसर इत्यादी भागातील बरीच नावे प्रभाग क्रमांक आठ मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. तरी या भागातील मतदारांची नावे दुरुस्त करून नव्याने यादी प्रकाशित करावी अशी विनंती वजा मागणी निवेदनाद्वारे प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी मनपा निवडणूक अधिकाऱ्याकडे केली आहे. निवेदन देतेवेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मंगेश भटकर, निखिल देशमुख, प्रफुल्ल डोंगरे, रोशन कडू, दिलीप वऱ्हाडे, प्रथमेश कोचराम, सतीश चरपे, अजित काळबांडे, विशाल बोरखडे, अक्षय ढोले, सईद भाई इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ. उज्वल बारंगे शनिवारी सह्याद्री वाहिनीवर

## 'गुदगत आजार आणि उपचार पद्धती'वर करणार मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२अमरावती :** ७अमरावती शहरातील प्रख्यात शल्य चिकित्सक डॉ. उज्वल बारंगे यांची मुलाखत येत्या शनिवारी ६ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील 'आरोग्य संपदा' कार्यक्रमातून प्रसारित होणार आहे. 'गुदगत आजार आणि उपचार पद्धती' या विषयावर त्यांच्याशी अमरावतीचे प्रख्यात निवेदक नितीन भट संवाद साधणार आहेत.डॉ. उज्वल श्रीरामजी बारंगे शल्य चिकित्सक म्हणून गेल्या २८ वर्षांपासून कार्यरत असून अमरावती येथे प्रशांतनगरात अनुश्री स्पेशालिटी हॉस्पिटल हे त्यांचे रुग्णालय आहे. गुदगत आजारावर लेझर सर्जरी करणारे तज्ञ म्हणून ते ओळखले जातात.



आतापर्यंत १० हजारच्या वर यशस्वी शस्त्रक्रिया करण्याचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. गुदगत आजारांचे प्रकार, अवघड जागेचे दुखणे म्हणून असे आजार लपविण्याची रुग्णांची मानसिकता, आजाराची कारणे, आजारांच्या स्टेजेस, औषधांनं बरा होणारा आजार आणि ऑपरेशनची अपरिहार्यता, समाजात या आजारांबाबत पसरलेले गैरसमज, उपचारादरम्यान घ्यायची काळजी, पथ्ये, खाण्यापिण्याची बंधने, दुखणे बरे होण्याचा कालावधी, गुदगत आजारांमध्ये रेडिओ फ्रिक्वेन्सी लेझर सर्जरी तंत्राचा वापर, आजार पुन्हा बळावण्याची शक्यता, गुदगत आजारात आनुवंशिकतेचा भाग, अशा विविधांगी मुद्यांवर डॉ. उज्वल बारंगे आपल्या मुलाखतीतून प्रकाश टाकणारा आहेत. नागपूर दूरदर्शनने या कार्यक्रमाची निर्मिती केलेली असून कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन कार्यक्रमाचे निर्माता मनोज जैन आणि निर्मिती सहाय्यक मिलिंद नेटके यांनी केले आहे.

# छतावरील टिनपत्रे उचलून पाच दुकान फोडणारा चोरटा गजाआड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ अमरावती**

**चांदूर रेल्वे** शहरात पाच दिवसांपूर्वी अज्ञात चोरट्याने पाच दुकानांमध्ये चोरी केली होती. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका अट्टल चोरट्याला सोमवारी (दि. १) अटक केली आहे. चांदूर रेल्वे येथील पाचही दुकानात त्याने चोरी केल्याची कबुली पोलिसांना दिली आहे.उमेश उर्फ गरिब्या श्रावण तुंबवाड (३७, रा. पडसा, ता. माहूर जि. नांदेड) असे पोलिसांनी पकडलेल्या चोरट्याचे नाव आहे. २५ नोव्हेंबरला मध्यरात्री दरम्यान चांदूर रेल्वे शहरातील सचिन मोटवानी यांच्या किराणा दुकानात चोरी झाली होती, त्यावेळी चोरट्याने त्यांच्या दुकानावरील छताचे टिन वाकवून दुकानात प्रवेश केला होता. त्यानंतर दुकानातील रोख, विलायची व अन्य साहित्य चोरी केले होते. मोटवानी यांच्या दुकाना व्यतिरिक्त त्याच रात्री अन्य चार दुकानांमध्ये चोरी झाली होती. ती चोरीसुध्दा छतांवरील टिन वाकवून चोरट्याने प्रवेश करून केली होती. या प्रकरणाच्या तपासात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांनी पीएसआय मूलचंद भांबुरकर व त्यांच्या पथकाला चोरट्यांचा शोध घेण्याबाबत आदेशित केले होते. या प्रकरणात पीएसआय भांबुरकर व त्यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे ३० नोव्हेंबरला रात्री उमेश तुंबवाड याला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली असता त्याने चांदूर रेल्वे येथील या पाचही दुकानांमध्ये चोरी केल्याचे कबुल केले आहे. त्याच्याकडून पोलिसांनी १ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील कारवाईसाठी या चोरट्याला चांदूर रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नया अकोला येथे उसळणार हजारोंचा जनसमुदाय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ नया अकोला**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अमरावती जिल्ह्यातील नया अकोला येथे सहा डिसेंबर शनिवार रोजी त्यांच्या पवित्र अस्थी स्मारकाजवळ काँग्रेस पक्षाच्या वतीने भव्य अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे

माजी पालकमंत्री ड यशोमती ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या अभिवादन यात्रेचे गेली तीन वर्षे आयोजन करण्यात येत असून यावर्षी या अभिवादन सभेला माजी केंद्रीय मंत्री तथा राज्यसभा खासदार मुकुल वासनिक आणि सोलापूरच्या लोकसभा खासदार प्रणिती शिंदे उपस्थित राहणार आहेत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी स्मारकाचे जतन करणे आणि हा ऐतिहासिक ठेवा जनमानसांपर्यंत पोहोचवणे पुस्तकांचे भव्य दालन करणे या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध प्रकाशन संस्थांची पुस्तकांची दालने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत यामुळे आंबेडकरी साहित्य आणि इतर महत्त्वपूर्ण पुस्तके सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध होतील अस्थी स्मारकाची महतीडॉ बाबासाहेब





आंबेडकर यांच्या अस्थी या पवित्र भूमीत आहेत ही बाब गेली ६५ वर्षे म्हणावी तितकी प्रकाशात नव्हती या अभिवादन यात्रेच्या आयोजनामुळे या ऐतिहासिक स्थळाचे महत्त्व आता मोठ्या प्रमाणात प्रकाशात आले आहे दरवर्षी जिल्हाभरातून हजारो आंबेडकरी अनुयायी व नागरिक या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी येतात या अभिवादन यात्रेत जिल्ह्यातील प्रत्येक विहारात असलेले वंदना संघ सामाजिक संघटना तसेच सर्व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहतात.

# सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी पातुरकर यांच्या घरी धाडसी चोरी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२अमरावती**

सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी पातुरकरयांच्या घरी धाडसी चोरी झाल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. याघटनेत राजापेठ पोलिसांनी मोहन वामनराव पातुरकर यांच्या तक्रारीवरून चोरीचा गुन्हा दाखल करून शोध सुरू केला.सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी मोहन पातुरकर हे परिवारासह १९ नोव्हेंबरला नागपूरला काही कामानिमित्त गेले होते. सकाळी घरी परत आले असता त्यांना खिडकीची लोखंडी ग्रील तुटलेली दिसताच दरवाज्याचे कुलूप उघडून त्यांनी घराची पाहणी केली. आलमारी उघडी दिसली आणि आलमारीतील १० ग्रॅमचे सोन्याचे दागिने चोरी झालेले लक्षात आले. त्यांनी राजापेठ पोलिसांना याबाबतची माहिती दिली. पोलीस घटनास्थळी पोहचले आणि पंचनामा करून अनोळखी चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला.

# हिमालयातील बर्फवृष्टीमुळे शहरात ४ डिसेंबरनंतर पारा १० अंशावर येणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–** सध्या उत्तरेकडून थंड वारे वाहत असल्यामुळे शहरातील किमान तापमानात घट झाली आहे. – सोमवार १ रोजी किमान तापमान – १२.५ तर कमाल तापमान ३०.२ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले.



किमान तापमानासह कमाल तापमानातही घट होत आहे. सध्या अंशतः ढगाळ वातावरण असून चक्रीवादळ सेनयार सध्या थंडावले आहे. श्रीलंकेजवळ डिटवा नामकवादळ सक्रीय झाले असून, आंध्र प्रदेशात थांबले आहे. त्यामुळे जिल्ह्यात अंशतः वातावरण आहे. ही ढगाळ ढगाळ परिस्थिती ४ तारखेपर्यंत याच निवळल्यानंतर तसेच कालावधीत हिमालयावर बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात पारा १० अंशाखाली घसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात कडाक्याची थंडी राहणार असल्याचा अंदाज श्री शिवाजी हवामानतज्ज्ञ प्रा. अनिल बंड कृषी हवामान केंद्राचे यांनी दिली. डिसेंबर महिना शक्यता आहे, असा अंदाजही कडाक्याच्या थंडीचा राहण्याची त्यांनी वर्तवला आहे.

# इतवारा बाजार परिसरातील फर्निचर व प्लास्टीकच्या दुकानाला भीषण आग

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२ अमरावती–** रविवारी मध्यरात्री इतवारा बाजार परिसरातील फर्निचर व प्लास्टीकच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना घडली. अग्निशमन विभागाने वेळीच धाव घेतल्यामुळे मोठा अनर्थ टळला.इतवारा बाजार येथील लक्कड बाजार येथे सैयद इमरान यांच्या मालकीचे महबुब फर्निचर नावाने दुकान आहे. दुकानात वेगवेगळे फर्निचर व लाकडे आहेत. रविवारी मध्यरात्री अचानक दुकानाला आग लागल्यामुळे परिसरात चांगलीच खळबळ उडाली. फर्निचरच्या दुकानालगतप्लास्टीकचे दुकान असल्यामुळे त्यालासुध्दा आग लाग जागरूक नागरिकांनी अग्निशमन विभागाला माहिती दिली असता सहा बंब घटनास्थळी पोहचले आणि पाण्याचा मारा केला. त्यामुळे आग आजुबाजुच्या दुकानापर्यंत पोहोचली नाही. मात्र आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती अग्निशमन विभागाच्या



अधिकाऱ्यांनी दिली.

# २४ नगरपरिषद, नगरपंचायतींसाठी आणि १५४ सदस्यपदांसाठी आता २० डिसेंबरला मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई–** नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांसंदर्भात २३ नोव्हेंबर २०२५ किंवा त्यानंतर निर्णय आलेल्या २४ अध्यक्षपदांच्या आणि विविध ठिकाणच्या १५४ सदस्यपदाच्या जागांवरील निवडणुकांची प्रक्रिया अपील कालावधीनंतरच्या पुढील टप्प्यापासून सुधारित कार्यक्रमानुसार राबविली जाईल. त्यासाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. उर्वरित अन्य सर्व ठिकाणी नियोजित निवडणूक कार्यक्रमानुसार २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होईल. महाराष्ट्र निवडणूक आयोगानं प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात ही माहिती दिलेली आहे.




राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. आता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर आल्याने संबंधित ठिकाणी सुधारित कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. अध्यक्षपदासंदर्भातील अपिलांचा निकाल उशिरा आलेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या संपूर्ण क्षेत्रासाठी निवडणूक प्रक्रिया सुधारीत कार्यक्रमानुसार राबविली जाईल.

अध्यक्षपदासोबतच सदस्यपदांची एकत्रित निवडणूक घेण्याची कायद्यात तरतूद आहे. ज्या ठिकाणच्या सदस्यपदासाठी अपील होते, तिथे मात्र फक्त त्या जागेपुरताच सुधारित निवडणूक कार्यक्रम राबविला जाईल.

अपील कालावधीनंतरच्या टप्प्यांसाठीच्या सुधारित कार्यक्रमानुसार आता १० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेता येतील. अंतिमरीत्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी आणि निवडणूक चिन्हांचे वाटप ११ डिसेंबर २०२५ रोजी होईल. २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

# मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरकडून घनकचरा व्यवस्थापन सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** घनकचरा संकलन व वाहतुकीसाठी अमरावती महानगरपालिकेने उल्हासनगर (ठाणे) येथील मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, या कंपनीची निवड केली असून या कंपनीने सोमवारपासूनच (१ डिसेंबर २०२५) प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाने स्वच्छता ही निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या कंत्राटानुसार शहरातील पाचही



झोनमधून संकलित झालेला कचरा आकोली व सुकळी येथील प्रक्रिया केंद्रापर्यंत पोहोचवणे हे नियमित काम मे. कोणार्क कंपनी करणार आहे. तसेच भविष्यात प्राथमिक संकलनाचे (द्वार–द्वार संकलन) काम बंद पडल्यास आपत्कालीन स्थितीत तेही काम कंपनीकडे सोपवले जाईल.

सध्या कंपनीने ५ मोठी रिफ्यूज कॉम्पॅक्टर वाहने (१४ घनमीटर), जेसीबी मशिन्स तसेच आवश्यक मनुष्यबळ शहरात तैनात केले आहे. पूर्ण क्षमतेने काम सुरू झाल्यावर कंपनीकडे २७ हून अधिक मोठी वाहने व ५४ कर्मचारी तसेच गरज पडल्यास ५१८ वाहने व १२५१ कर्मचारी उपलब्ध असतील.पूर्वी हे काम मे. पूजा कन्स्ट्रक्शन कंपनी करीत होती. त्यांचा करार संपुष्टात आल्याने नवीन निविदा काढण्यात आली. नागपूर, इंदूर आदीशहरांच्या यशस्वी मॉडेलचा अभ्यास करून अमरावतीत एकात्मिक प्राथमिक–द्वितीयक वहन पद्धत लागू करण्यात येत आहे. निविदेवर उच्च न्यायालयाच्या खंडपीठात याचिका दाखल असूनही न्यायालयाने काम थांबविण्याचा कोणताही स्थगनादेश दिलेला नाही, असे महापालिकेच्यासूत्रांनी सांगितले. शहरातील स्वच्छता व्यवस्थेत सुसूत्रता यावी व नागरिकांना दर्जेदार सेवा मिळावी यासाठी हे पाऊल महत्त्वाचे असल्याचे आयुक्तांनी म्हटले आहे. पुढील काही दिवसांत नवीन यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# उमेदवाराच्या पतीवर प्राणघातक हल्ला, अकोटमधील धक्कादायक प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अकोला :** ‘एआयएमआयएम’च्या उमेदवाराच्या पतीवर अकोट येथे अज्ञात चार ते पाच जणांकडून प्राणघातक हल्ला करण्यात आल्याचा प्रकार सोमवारी घडला. यामध्ये ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. हा हल्ला नेमका का? करण्यात आला, याचा पोलीस तपास करीत आहेत. दरम्यान, मूर्तिजापूर येथील मतदार यादीत प्रचंड घोळ असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवाराने केला आहे.



नगर पालिका आणि नगर पंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. मतदान तोंडावर आले असतांनाच अनेक धक्कादायक घडामोडी समोर येत आहेत. अकोट नगर पालिका निवडणुकीत ‘एआयएमआयएम’ पक्षाच्या प्रभाग क्रमांक १५ (अ) मधील अधिकृत उमेदवार उज्ज्वला राजेश तेलगोटे यांचे पती राजेश तेलगोटे हे १ डिसेंबर रोजी बाहेर गेले होते.

यावेळी कालवाडी मार्गावरील रामनारायण फार्मजवळ पाठीमागून आलेल्या चार ते पाच अज्ञात व्यक्तींनी लोखंडी पाईपने त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. अचानक झालेल्या हल्ल्यात तेलगोटे गंभीर जखमी झाले. काही नागरिकांनी त्यांना गंभीर अवस्थेत अकोट ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच अकोट शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून तपास सुरू केला आहे. हल्लेखोरांचा शोध पोलीस घेत आहेत.

# मोबाईलमध्ये सायबर सिक्युरिटी ॲप द्यावे लागेल

## सरकारने कंपन्यांना दिली ९० दिवसांची मुदत संचार साथी’ ॲपमुळे हरवलेले ७ लाख फोन सापडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ नवी दिल्ली**
आता प्रत्येक नवीन स्मार्टफोनमध्ये ’संचार साथी’ हे सायबर सिक्युरिटी ॲप प्री–इन्स्टॉल (आधीपासून डाउनलोड केलेले) मिळेल. केंद्र सरकारने स्मार्टफोन कंपन्यांना आदेश दिला आहे की, त्यांनी स्मार्टफोनमध्ये सरकारी सायबर सेफ्टी ॲप आधीपासून इन्स्टॉल करून विकावे. न्यूज एजन्सी रॉयटर्सनुसार, हा आदेश आज समोर आला आहे. यामध्ये ॲपल, सॅमसंग, विवो, ओप्पो आणि शाओमीसारख्या मोबाईल कंपन्यांना ९० दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. हे ॲप वापरकर्ते डिलीट किंवा डिसेबल करू शकणार नाहीत. जुन्या फोनवर सॉफ्टवेअर अपडेटद्वारे हे ॲप इन्स्टॉल केले जाईल.

तथापि, हा आदेश सध्या सार्वजनिक करण्यात आलेला नाही, तर निवडक कंपन्यांना खासगीरित्या पाठवण्यात आला आहे. याचा उद्देश



सायबर फसवणूक, बनावट खचएख नंबर आणि फोन चोरी रोखणे हा आहे.

एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने सांगितले, ’बनावट IMEI मुळे होणारी फसवणूक आणि नेटवर्कचा गैरवापर रोखण्यासाठी हे ॲप आवश्यक आहे.’

**संचार साथी ॲप काय आहे, ते कशी मदत करेल?**

संचार साथी ॲप हे सरकारने तयार केलेले सायबर सुरक्षा साधन आहे, जे १७ जानेवारी २०२५ रोजी लाँच करण्यात आले होते.

सध्या हे ॲपल आणि गुगल प्ले स्टोअरवर ऐच्छिक डाउनलोडसाठी उपलब्ध आहे, परंतु आता नवीन फोनवर ते अनिवार्य असेल.

हे ॲप वापरकर्त्यांना कॉल, मेसेज किंवा व्हॉट्सॲप चॅट रिपोर्ट करण्यास मदत करेल.

IMEI नंबर तपासणी करून चोरी झालेले किंवा हरवलेले फोन ब्लॉक करेल.

डुप्लिकेट IMEI नंबरमुळे सायबर गुन्हे वाढत आहेत.भारतात १.२ अब्जाहून अधिक मोबाइल वापरकर्ते आहेत, जे जगातील सर्वात मोठे मार्केट आहे, परंतु बनावट किंवा डुप्लिकेट IMEI नंबरमुळे सायबर गुन्हे वाढत आहेत. खचएख हा १५ अंकी एक अद्वितीय कोड असतो, जो फोनची ओळख पटवतो. गुन्हेगार ते क्लोन करून चोरीचे फोन ट्रॅक होण्यापासून वाचवतात, फसवणूक करतात किंवा काळ्या बाजारात विकतात. सरकारचे म्हणणे आहे की, हे ॲप पोलिसांना डिव्हाइस शोधण्यात मदत करेल. सप्टेंबरमध्ये DoT ने सांगितले होते की, २२.७६ लाख डिव्हाइस शोधले गेले आहेत.

# ठिय्या आंदोलनाचा इशाऱ्यानंतर तातडीने डीपी मंजूर

## धानोरा दोन येथे १०० केव्हीए तर कडू–पोजगे आणि दहेगाव धानोरा येथे ६३ केव्हीएची डीपी लावली

## प्रशांत कांबळे यांच्या आंदोलनाला यश; प्रशासनाने घेतली दखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२तिवसा:**
तालुक्यातील १५ गावातील शेतकऱ्यांनी ओव्हरलोड डीपी दुरुस्ती किंवा नवीन डीपी देण्याची मागणी शुक्रवारी ता.२८ नोव्हेंबर रोजी केली होती. मागणीनंतरही तीन दिवस होऊन कारवाई झाली नाही. परिणामी दहेगाव धानोरा डीपीचे ऑइल लिकेज होऊन पेट घेतल्याची घटना रविवारी झाली. यासंदर्भातील माहिती उपकार्यकारी अभियंता अधिकाऱ्यांना माहिती देऊन सोमवारी ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी दिला होता. परिणामी उपकार्यकारी अभियंता निलेश उईके यांनी आंदोलची दखल घेऊन तातडीने धानोरा दोन येथे १०० केव्हीए तर कडू–पोजगे आणि दहेगाव धानोरा येथे ६३ केव्हीएचा डीपी बसवण्याचे आदेश दिले.

धोत्रा, शिरजगाव मोझरी गावातील शेतकऱ्यांचे कृषी पंप दहेगाव धानोरा डीपीवर आहे. गेल्या १५ दिवसांपासून या डीपीवरील नादुरुस्तीमुळे शेतकऱ्यांचे रब्बीचे पिक संकटात सापडले होते. हरभरा, गहू आणि पालेभाज्याचे पिकांचे



उत्पन्न घेणाऱ्या शेतकरी अडचणीत सापडला होता. सोमवारी (ता.१) रोजी शेतकऱ्यांनी पुन्हा उपकार्यकारी अभियंता निलेश उईके यांना निवेदन देऊन ठिय्या आंदोलन करण्यात आले. जोपर्यंत डीपी घटनास्थळावर जात नाही तोपर्यंत कार्यालयातून ठिय्या सोडणार नसल्याची भूमिका प्रशांत कांबळे यांनी घेतली होती.

परिणामी उपकार्यकारी अभियंता उईके यांनी तातडीने फोनद्वारे संपर्क करून तातडीने डीपी बसवण्याच्या सूचना दिल्या सोमवारी दुपारी १२ वाजता सुरू झालेल्या या ठिय्या आंदोलनानंतर अर्ध्या तासातच उपकार्यकारी अभियंता उईके यांनी जिल्हा कार्यालयांशी संपर्क करून ६३ केव्हीए डीपी तातडीने लावण्याचे आदेश दिल्याने धोत्रा, शिरजगाव मोझरी गावच्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून प्रशांत कांबळे यांनी ठिय्या आंदोलनातून माघार घेतली. यावेळी विजय कुरळकर, एड.विकास तुरकाने, धोत्रा ग्रामपंचायत सरपंच भूषण गाठे, स्वप्नील तुरकाने, अमोल बेंद्रे, प्रभाकर वावरे, भाऊराव वैद्य, सुरेंद्र वाहने या शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# विभागीय युवक महोत्सवाचा उत्साहात शुभारंभ

## महोत्सवातून तरूणाईच्या सर्जनशीलतेचा आविष्कार – जिल्हाधिकारी वर्षा मीना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अकोला, :** तरूणांतील प्रज्ञा, प्रतिभा व नवसर्जनशीलतेचा आविष्कार युवक महोत्सवासारख्या उपक्रमातून होतो. जीवनात करिअरइतकेच कलागुणांनाही प्राधान्य दिले पाहिजे. त्यातून व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास होतो. त्यामुळे आयुष्यात कुठल्याही क्षेत्रात करिअर केले तरी छंद, कलागुण कायम जोपासा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

क्रीडा विभागातर्फे विभागीय युवक महोत्सवाचा शुभारंभ वसंत देसाई क्रीडांगणात जिल्हाधिका–यांच्या हस्ते झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, प्रा. मधू जाधव, शाहीर वसंत मानवटकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. लोकनृत्य, चित्रकला, लोकगीत, वक्तृत्व, कवितालेखन व नवोपक्रम म्हणून विज्ञान प्रदर्शन अशा विविध सादरीकरणांची रेलचेल असलेल्या विभागीय युवक महोत्सवात पाचही जिल्ह्यातील गुणवंत महाविद्यालयांचा सहभाग आहे.

महोत्सव हा प्रज्ञा– प्रतिभांचा संगम असून, युवकांनी आपले कलागुण आयुष्यभर जोपासण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी केले. यावेळी त्यांनी विज्ञान प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांकडून त्यांच्या प्रयोगांची माहिती जाणून घेतली.




श्री. भट यांनी प्रास्ताविक केले. विकास पल्हाळे यांनी सूत्रसंचालन केले. अनिल निंबाळकर, तेजस्विनी समर्थ, अर्चना गुप्ता, संजय आगाशे, विशाल नंदागवळी, सुभाष धार्मिक, संदीप शेवलकर, स्वप्नील इंगोले, आकाश हराळ, डॉ. अर्जन बी युसुफ शेख, अमोल शिरसाट, नितीन मोहोड, राजेश चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# हिंद दी चादर कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवा, मान्यवरांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त नागपूर येथे ७ डिसेंबर रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला समाजातील सर्व घटकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मान्यवरांनी केले.

जिल्हा नियोजन सभागृहात आज हिंद दी चादर कार्यक्रमानिमित्त बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, महंत जितेंद्रजी महाराज, राज्यस्तरीय समितीचे सदस्य किसन राठोड, सदाशिव चव्हाण, नंदू पवार, डॉ. निख्खू खालसा, रवींद्रसिंग सलुजा, अनिता पवार , छाया राठोड, बबीता राठोड, ड. नवलानी, वासुदेव महाराज, दिनेश सचदेव आदी उपस्थित होते.

जितेंद्र महाराज यांनी सर्व समाजाच्या वतीने शहिदी समागमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम एक बलिदानाची आठवण व्हावी, तसेच आपल्या संस्कृतीची जाण नव्या पिढीला व्हावी, यासाठी आयोजित करण्यात आला आहे. या माध्यमातून आपली संस्कृती जपली जाणार आहे. गुरु तेग बहादुर यांनी धर्म रक्षणासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले आहे. त्यांचा त्याग पुढील काळातही माहिती होण्यास या कार्यक्रमामुळे मदत मिळणार आहे.




राज्यस्तरीय समिती सदस्य किसन राठोड यांनी कार्यक्रमामागील सरकारची भूमिका सांगितली. गुरु तेग बहादुर यांची शहादत ही संपूर्ण मानवतेसाठी होती. त्यांच्या बलिदानामुळेच देश टिकून आहे. त्यांचे स्मरण व्हावे, तसेच आपल्या समृद्ध इतिहासाची माहिती समाजाला होण्यासाठी सर्वांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. शासनाने एक चांगला उपक्रम हाती घेतला असून राज्यभरात तीन कार्यक्रम होणार आहे. यासाठी समितीही गठीत करण्यात आली आहे. प्रचार आणि प्रसारासाठी गाव, तांड्यामध्ये चित्ररथ फिरविण्यात येत आहे. तसेच नागरिकांच्या भेटी घेण्यात येत आहे. शाळांमधून गुरु तेग बहादुर यांच्या जीवनावरील चित्रफीत दाखविण्यात येत आहे.

या सर्व माध्यमातून समाजाच्या मनाचा विकास होणे आवश्यक आहे. महान व्यक्तींचे कार्य पुढील पिढीसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. त्यांच्या कार्यामधून समाज प्रभावित होणार आहे. त्यामुळे संपूर्ण समाजाने सेवक होऊन या कार्यक्रमात सहभागी व्हावे. शासनाने कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे देश घडविण्यासाठी नागपूर येथील कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी जिल्हास्तरावर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्येकावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. आतापर्यंत लोकसभागातून चार बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच अमरावती ते नागपूर मार्गावर वैद्यकीय सुविधा उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे समाजातील दानशूर व्यक्तींनी यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.डॉ. निख्खू खालसा यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत माहिती दिली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भित्ती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी गुरु तेग बहादुर यांच्या जीवनावरील चित्रफीत दाखवण्यात आली. तसेच उपस्थित त्यांच्या प्रश्नांचचे निराकरण करण्यात आले.

# घरफोडी करणारे सराईत चोरटे मध्यप्रदेशातून जेरबंद

## शहरातील पाच गुन्ह्यांची दिली कबुली, गुन्हे शाखेची कारवाई




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

घरफोडी करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी मध्यप्रदेशातील खाडा फलिया गावातून अटक करून मुद्देमाल जप्त केला. तसेच त्यांनी शहरातील पाच घरफोडीच्या घटनांची कबुली दिली. राकेश केरमसींग बमनिया (वय २७) आणि भवरसींग सोमला बमनिया (वय ३३) दोन्ही रा. खाडा फालिया, बडीउटी, कंडलवासा, अलीराजपूर, मध्यप्रदेश अशी अटकेतील चोरट्यांची नावे आहेत. तर रमेश नरसिंह चव्हाण उर्फ भिलाला (रा. पिंपलदलीया, तांडा जि. धार, मध्यप्रदेश) व रोहीत भांगडीया मावीखाडाफलीया, बडीउटी, कुंडलवासा, आलीराजपूर, मध्यप्रदेश) अशी पसार आरोपींची नावे आहेत.

शहरात मागील काही दिवसांत चोरी व घरफोडीच्या घटना सातत्याने उघडकीस आल्या होत्या. दरदिवसाला चोऱ्या होत असल्यामुळे स्थानिक नागरिकांनी आपआपल्या परिसरात रात्रीची गस्त सुरू केली होती. तरीसुध्दा चोरीचेप्रमाण कमी झाले नाही. उलट ८ ते १० लाख रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला होता. त्यामुळे गुन्हे शाखेच्या पथकाने प्रत्येक घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. परिसरातील काही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली असता चार युवक एका घरात चोरी करतांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले होते. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आणि बारकाईने पाहणी केली असता चारही युवक मध्यप्रदेशातील सराईत चोरटे असल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्यांची माहिती घेतली असता चौघेही चोरटे मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यातील खाडा फलिया गावातील असल्याचे समोर आले. खाडा फलिया गाव हे चोरट्यांचे गाव असून भारतातील पोलीस आरोपींच्या शोधात या गावात येतात. त्यामुळे गुन्हे शाखेचे पथक पाच दिवसांपासून गावात ठिय्या मांडून होते. रविवारी राकेश बमनिया गावात आल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्या मदतीने भवरसिंग बमनिया याला अटक केली. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी शहरात पाच ठिकाणी घरफोडी केल्याचे पोलिसांना सांगितले.गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, अनिकेत' कासार (सायंबरे), प्रियंका कोटावार (सायबर), अंमलदार सतीश देशमुख, गजानन ढेवले, फिरोज खान, मनोज ठोसर, संग्राम भोजने, मिर्झा नईम बेग, विकास गुडधे, रंजीत गावंडे, योगेश पवार, संदीप खंडारे, प्रभात पोकळे, सुषमा आठवले (सायबर) यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# भारताला कुस्ती स्पर्धेत सुवर्णासह दोन पदके

## टोकियोतील डेफ ऑलिम्पिक गेम्सतील मल्लांना डॉ.राहल, इरशाद खान यांचे मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

टोकियो येथील डेफ ऑलिम्पिक गेम्समधील कुस्ती स्पर्धेत दोन भारतीय पहिलवानांनी अमरावतीचे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक डॉ. रणवीरसिंग राहल, इरशाद खान यांच्या मार्गदर्शनात दोन पदकांची कमाई केली. १५ ते २६ नोव्हेंबर या कालावधीत झालेल्या कुस्ती स्पर्धेत फ्रीस्टाइल प्रकारात भारतीय डेफ कुस्ती संघ सहभागी झाला होता.

ऑल इंडिया स्पोर्टस कौन्सिल ऑफ द डेफ या संस्थेने राष्ट्रीय डेफ निवड चाचणी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केली. देशभरातून ६ वजन गटात ६ कुस्तीपटूंची निवड केली होती. त्यानंतर भारतीय कुस्ती संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून डॉ.रणवीरसिंग राहल, प्रशिक्षक इरशाद खान रऊफ खान यांची निवड करण्यात केली. उन्हाळी डेफ ऑलिम्पिक गेम्समध्ये भारतीय डेफ कुस्ती संघाने सर्वोत्तम कामगिरी करून एक सुवर्ण व रौप्य पदक जिंकले. फ्री स्टाईलमध्ये सुमित दहिया ने ९७ किलो वजन गटात सुवर्ण पदक व अमित कृष्ण दलाल यांनी ८६ किलो वजन गटात रौप्य पदक असे एकूण २ पदके पटकावले. या यशाबद्दल आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संदेशाद्वारे अभिनंदन केले. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया, युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार दिल्ली, डॉ. रणवीर सिंग राहल, इरशाद खान रऊफ खान, पदक विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

तसेच दुसरे कुस्ती प्रशिक्षक म्हणून इरशाद खान रऊफ खान हे अमरावती महानगरपालिका येथे आरोग्य विभागात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहे व भारतीय डेफ कुस्ती संघाचे ६ वर्षांपासून कुस्ती प्रशिक्षक म्हणून कार्य करीत आहे. तसेच ७ वेळा विदेशात जाऊन भारताचे डेफ कुस्ती प्रशिक्षक म्हणून प्रतिनिधित्व केले आहे.

डॉ. राहल ८ वर्षांपासून भारतीय संघाचे प्रशिक्षक यापूर्वी डॉ. रणवीरसिंग राहल सतत आठ वर्षांपासून भारतीय कुस्ती संघाचे प्रमुख कुस्ती प्रशिक्षक म्हणून कीर्गिस्तान, मलेशिया अमान जॉर्डन, इस्तंबूल तुर्की, उझबेकिस्तान, इराण, चायनीज ताईपाई, रशिया, बल्गेरिया, झग्रेब या देशात यशस्वीपणे भारताचे प्रशिक्षक म्हणून नेतृत्व केले. देशाला जास्तीत जास्त पदक प्राप्त करण्यास यशस्वी कुस्ती प्रशिक्षक ठरले. सध्या डॉ. रणवीरसिंग राहल हे अमरावती शहर पोलिस आयुक्तालय येथे अरविंद चावरिया यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत.

# विद्यापीठाच्या पीएच.डी. प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर

## अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पीएच.डी. २०२५-२६ या शैक्षणिक सत्रासाठी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून १७ डिसेंबर, २०२५ पर्यंत अर्ज भरता येईल. याबाबतची अधिसूचना क्र. १७/२०२५ दि. २७ नोव्हेंबर,२०२५ रोजी निर्गमित केली आहे.जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार १६ डिसेंबर पर्यंत अर्ज सादर करणे, पात्र उमेदवारांची यादी व मुलाखती दि. १७ ते २४ डिसेंबर, संशोधन सल्लागार समितीव्दारे घेण्यात येणा-या मुलाखती दि. २६ डिसेंबर ते ०२ जानेवारी, २०२६, निवड झालेल्या उमेदवारांची यादी व प्रवेश निश्चिती दि. ३ ते ५ जानेवारी, ऑनलाईन नावनोंदणी दि. ६ ते १५ जानेवारी, नावनोंदणी पडताळणी यादी व पावती सादर करणे दि. १६ ते २२ जानेवारी आणि दि. २५ जानेवारी पासून पीएच.डी. कोर्स वर्क ला सुरुवात होईल.विषयनिहाय रिक्त जागा व मान्यताप्राप्त मार्गदर्शक यांची यादी विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पेट परीक्षेतून सुट मिळालेल्या विद्यार्थ्यांचाही या प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश असेल. इच्छुक संशोधक विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत आपले अर्ज संबंधित संशोधन केंद्रांवर सादर करावेत, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले आहे.

# ४ ते ८ डिसेंबरदरम्यान धावणार बडनेराहून जाण्यासाठी नागपूर-सीएसएमटी विशेष गाड्यांची प्रशासनाकडून व्यवस्था

## महापरिनिर्वाणदिनी अमरावती-सीएसएमटी विशेष ट्रेन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त श्रद्धांजली देण्यासाठी मुंबईपर्यंत प्रवास करणाऱ्या अनुयायांच्या सुविधेसाठी रेल्वेने ४ ते ८ डिसेंबरपर्यंत १५ अनारक्षित विशेष ट्रेन चालवल्या जाणार आहेत. अमरावती-सीएसएमटी-अमरावती या दोन फेऱ्या होणार आहेत.




विशेष गाडी क्र. ०९२१८ अमरावती येथून ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.४५ वाजता निघेल व दुसऱ्या दिवशी पहाटे ५.२५ वाजता सीएसएमटी येथे पोहोचेल, विशेष गाडी क्र. ०९२१७ ही सीएसएमटी येथून ७ डिसेंबर रोजी रात्री १२.४० वाजता निघेल व त्याच दिवशी दुपारी १२.५० वाजता अमरावती मॉडेल रेल्वेस्थानकावर पोहोचेल. या ट्रेनला १६ द्वितीय श्रेणी शयनयान, २ द्वितीय श्रेणी चेअरकारसह गार्ड ब्रेकयान असे एकूण ८ कोच राहतील. ही गाडी दादर, कल्याण, इगतपुरी, नासिक रोड, मनमाड, चालीसगांव, फ्चोरा, जलगांव, भुसावळ, मलकापूर, नंदुरा, शेगांव, अकोला, मुर्तिजापूर व बडनेरा स्टेशनवर थांबा घेईल.

बडनेराहून ४ डिसेंबर रोजी जाणारी ट्रेन क्र. ०१२६० नागपूर- सीएसएमटी विशेष नागपुरातून सायंकाळी ६.१५ वाजता प्रस्थान करेल. तर दुसऱ्या दिवशी सकाळी १०.५५ वाजता सीएसएमटी येथे पोहोचेल. गाडी क्र. ०५२६२ नागपूर- सीएसएमटी ही नागपुरातून रात्री ११.५५ वाजता निघून दुसऱ्या दिवशी दुपारी ३.५० वाजता सीएसएमटी येथे पोहोचेल. ही बडनेरा स्थानकावर रात्री ९.४० वाजता पोहोचेल. ५ डिसेंबर रोजी गाडी क्र. ०९२६४ नागपूर-सीएसएमटी विशेष नागपुरातून सकाळी ८ वाजता निघून त्याच दिवशी रात्री ११.४५ वाजता सीएसएमटीला पोहोचेल. बडनेरा स्थानकावर सकाळी ११.३० वाजता पोहोचेल.गाडी क्र. ०९२६६ नागपूर-सीएसएमटी ही नागपुरातून सायंकाळी ६.१५ वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी १०.५५ वाजता सीएसएमटी पोहोचेल. ही बडनेरा स्टेशनवर रात्री ९.३० दरम्यान येईल. सीएसएमटी ते नागपुर चार फेऱ्या होणार आहेत.त्यापैकी ६ डिसेंबर रोजी गाडी क्र. ०२२४९ सीएसएमटी-नागपूर ही सीएसएमटी येथून रात्री ८.५० वाजता निघेल.दुसऱ्या दिवशी सकाळी ११.२० वाजता नागपुरात पोहोचेल. तत्पुर्वी ती सकाळी ७.४५ वाजताच्या सुमारासबडनेरा स्थानकावर येईल. ७ डिसेंबर रोजी गाडी क्र. ०१२५१ सीएसएमटी-नागपूर विशेष सीएसएमटी येथून सकाळी १०.३० वाजता निघेल व त्याच दिवशी रात्री १२.५५ वाजता नागपुरात पोहोचेल. बडनेरा स्टेशनवर ही ट्रेन रात्री ९.३०वाजता पोहोचेल. ८ डिसेंबर रोजी गाडी क्र. ०९२५७ सीएसएमटी-नागपूर विशेष सीएसएमटी येथून रात्री १२.२० वाजता प्रस्थान करेल त्याच दिवशी दुपारी ४.१० वाजता नागपूरात पोहोचेल. तत्पुर्वी बडनेरा येथे दुपारी १२.४५ वाजता ट्रेनचे आगमन होईल.

**दादर ते नागपूर एक विशेष फेरी; रेल्वेला १८ कोच**

दादर ते नागपूर विशेष ट्रेन ७ डिसेंबर रोजी एक फेरी करणार आहे. गाडी क्र. ०१२५३ दादर-नागपूर रात्री १२.४० वाजता प्रस्थान करेल. त्याच दिवशी दुपारी ४.१० वाजता नागपूरात पोहोचेल. बडनेरा स्टेशनवर ही ट्रेन दुपारी १२.४५ वाजता येईल. मार्गात कल्याण, कसारा, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगांव,जळगाव, भुसावळ, मलकापूर, जलंब, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धामनगाव, पुलगाव, वर्धा, सेवाग्राम व अजनी स्टेशनवर थांबा घेईल. या विशेष ट्रेनला १६ द्वितीय श्रेणी शयनयान, सामान्य द्वितीय श्रेणी, चेअर कार व २ द्वितीय श्रेणी चेअर कारसह गार्ड ब्रेक व्हॅन असे १८ कोच राहणार आहेत.

# दर्यापूरातील प्रभाग क्र.२ नगरसेवक पदाची निवडणूक लांबणीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२दर्यापूर**

कॉंग्रेस पक्षांने प्रभाग क्रमांक २ (अ) मध्ये देविदास काळे व इंद्रजीत देशमुख या दोघांना एबी फार्म दिला होता. मात्र छाननी प्रक्रीयेत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी देवदास काळे यांचा अर्ज अवैध ठरवला होता. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाविरोधात जिल्हा संत्र न्यायालयात अपील दाखल केली होती. याप्रकरणात न्यायालयाने देवीदास काळे यांना अपक्ष उमेदवारी निवडणूक लढण्याची मुभा दिली.

दरम्यान निवडणूक आयोगाच्या सचिव यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या पत्रानुसार रविवारी प्रभाग क्रमांक २ (अ) येथील निवडणूक फक्त लांबणीवर गेल्याचे आदेश धडकले आहे. प्रभाग क्रमांक २ सोडून पूर्ण दर्यापूर शहरात निवडणूक २ डिसेंबर ला होईल.

प्रभाग क्रमांक २ मध्ये एतच् वर अध्यक्ष पदाची मत पत्रिका व २( ब) नगरसेवक पदाची मतपत्रिका राहील याची सगळ्यानी कृपया नोंद घ्यावी. असे आवाहन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ विकास खंडारे यांनी केले आहे.

# शिवसेना आमदाराच्या मुलाने बोगस मतदाराला पळवले

## काँग्रेसकडून गुन्हा दाखल करण्याची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२बुलढाणा**

बुलढाणा नगर पालिका निवडणूकीसाठी मतदानाला सुरुवात झाल्यानंतर दीड तास उलटत नाही तोच काँग्रेसने बोगस मतदानाला सुरूवात झाल्याचा आरोप केला होता. काँग्रेसने म्हटले होते की, प्रभाग क्रमांक १५ साठी गांधी प्राथमिक शाळेत मतदान केंद्र आहे. त्याठिकाणी वैभव देशमुख नावाच्या व्यक्तीच्या नावावर कोथळी ता. मोताळा येथील एका जणास उमेदवाराने मतदान केल्यानंतर पकडले आहे. त्याच्यासोबत आणखी एक जण आहे. कोथळी, इब्राहिमपूर येथून अन्य काही लोक बोगस मतदान करण्यासाठी आणले आहेत. तसेच घाटा खालून जवळपास दोन गाड्या भरून बुलढाण्यामध्ये बोगस मतदार आणले गेले आहेत. या गंभीर बाबीची दखल पोलीस प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली होती. त्यानंतर आता हर्षवर्धन सपकाळ यांनी बोगस मतदाराला पळवल्याप्रकरणी संजय गायकवाड यांच्या मुलावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

# मतदान सुट्टीचा गोंधळ, शिक्षण खाते निर्णयात उदासीन

## हजारो मतदार ठरणार मतदानवंचित? निवडणूक आयोग म्हणतो

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२वर्धा**

मतदान हे लोकशाहीत आवश्यक कर्तव्य. ते बजावता यावे म्हणून सार्वजनिक सुट्टी दिल्या जात असते. पण ही सुट्टी कोणास, असा नवाच पैलू पुढे करीत अनेकांना सुट्टी नाकारल्या गेली आहे. बाहेरगावी असणारे हजारो मतदार संभ्रमात पडले आहे. सुट्टीच नाही तर मी मतदानास स्वतः सुट्टी टाकून जावू कशाला, असे प्रश्न उपस्थित केल्या जात आहे. प्रामुख्याने शिक्षण क्षेत्रात ही बाब पुढे आली असून निवडणूक कार्यालय पण चक्रावून गेल्याचे चित्र आहे. शिक्षणाधिकारी कार्यालय केव्हा जागे होणार, असा सवाल शिक्षक नेते विचारत आहे.

झाले असे की निवडणूक कार्यालयाने पहिला आदेश काढला त्यात पालिकेसाठी २ तारखेस मतदान होत असल्याचे नमूद केल्या गेले. मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना मतदान साहित्य घेऊन जाण्यासाठी १ व २ तारीख म्हणजे सोमवार व मंगळवारी सुट्टी जाहीर करण्यात आली. म्हणून जिल्ह्यातील संबंधित नगर परिषद क्षेत्रातील शाळा, महाविद्यालय यांना सार्वजनिक सुट्टी देण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. पण केवळ नगर परिषद क्षेत्र असा उल्लेख असल्याने ग्रामीण भागात कार्यरत पण शहरात मतदार असलेल्या शिक्षक व अन्य शासकीय कर्मचाऱ्यांचे मतदान कसे होणार, ही बाब पुढे आली.

मतदान हे लोकशाहीत आवश्यक कर्तव्य. ते बजावता यावे म्हणून सार्वजनिक सुट्टी दिल्या जात असते. पण ही सुट्टी कोणास, असा नवाच पैलू पुढे करीत अनेकांना सुट्टी नाकारल्या गेली आहे. बाहेरगावी असणारे हजारो मतदार संभ्रमात पडले आहे. सुट्टीच नाही तर मी मतदानास स्वतः सुट्टी टाकून जावू कशाला, असे प्रश्न उपस्थित केल्या जात आहे. प्रामुख्याने




शिक्षण क्षेत्रात ही बाब पुढे आली असून निवडणूक कार्यालय पण चक्रावून गेल्याचे चित्र आहे. शिक्षणाधिकारी कार्यालय केव्हा जागे होणार, असा सवाल शिक्षक नेते विचारत आहे.

झाले असे की निवडणूक कार्यालयाने पहिला आदेश काढला त्यात पालिकेसाठी २ तारखेस मतदान होत असल्याचे नमूद केल्या गेले. मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना मतदान साहित्य घेऊन जाण्यासाठी १ व २ तारीख म्हणजे सोमवार व मंगळवारी सुट्टी जाहीर करण्यात आली. म्हणून जिल्ह्यातील संबंधित नगर परिषद क्षेत्रातील शाळा, महाविद्यालय यांना सार्वजनिक सुट्टी देण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. पण केवळ नगर परिषद क्षेत्र असा उल्लेख असल्याने ग्रामीण भागात कार्यरत पण शहरात मतदार असलेल्या शिक्षक व अन्य शासकीय कर्मचाऱ्यांचे मतदान कसे होणार, ही बाब पुढे आली.

निवडणूक आयोगाने मग राज्यस्तरीय सूचना देतांना नमूद केले की मतदार क्षेत्रातील जे मतदार कार्यक्षेत्रा बाहेर राहतील, त्यांना पण मतदान करण्यासाठी सुट्टी राहील. मात्र शाळा व्यवस्थापन व मुख्याध्यापक यांनी सुट्टी देण्यास मज्जाव केला. आपली शाळा मतदार क्षेत्रात येत नाही, तुम्हास सुट्टी मिळणार नाही अशी तंबी शिक्षण खात्याच्या संमतीने दिली. मग मतदान कसे करणार, असा प्रश्न उपस्थित झाल्यावर सांगण्यात आले की शाळा दोन शिफ्टमध्ये असते. म्हणून सकाळच्या शिफ्टमधील शिक्षकांनी दुपारी तर दुपारच्या शिक्षकांनी सकाळी मतदान करावे, असे स्वतःच ठरवून टाकले. यांस कुठल्याही नियमाचा आधार नव्हता.

सुट्टी कोणास याची शहानिशा नं करताच असे सूचित करण्यात आल्याने शेकडो शिक्षक द्विधा स्थितीत पडले. मतदान करावे की सुट्टी टाकून मतदानास जावे, असा हा संभ्रम. शिक्षणाधिकारी कार्यालयाने काहीच खुलासा नं केल्याने मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांस शाळेत हजर व्हा, मतदान करायचे की नाही हे तुम्ही ठरवा, असे सांगून टाकल्याची चर्चा सूरू झाली. पण प्रत्यक्षात पालिका मतदार कुठेही असो, तो ज्या ठिकाणी कार्यरत आहे त्यास सुट्टी दिली पाहिजे, असे स्पष्ट निर्देश आहेत.

वर्धा जिल्हाधकारी वान्मथी सी. यांनी आदेशच काढला की मतदान सुट्टी ही जे मतदार कामानिमित्त मतदारसंघबाहेर असतील त्यांना पण ही सुट्टी लागू राहील. एव्हडे स्पष्ट निर्देश आहे. म्हणजे एखादा मतदार अमरावती जिल्ह्यात नोकरीस असेल, पण तो वर्धा पालिकेत मतदार असेल त्यालाही सुट्टी लागू राहणार. पण शिक्षण खात्याने यावर खुलासा नं केल्याने मुख्याध्यापक आपापल्या परीने सुट्टी द्यावी की नाही असा निर्णय घेत असल्याचे आजचे चित्र आहे. अनेक शिक्षक वर्ध्यात मतदान असूनही शाळेत रुजू होण्यास प्राधान्य देत असल्याचे दिसले. मतदानसाठी आम्ही कश्याला सुट्टी घेऊ, अशी त्यांची भूमिका. माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना संपर्क होवू शकला नाही. मात्र जिल्हाधिकारी वान्मथी सी. म्हणतात की मतदार असलेल्या सर्वांना सुट्टी, असे स्पष्ट करून टाका.

# मतदान हे लोकशाहीत आवश्यक कर्तव्य. ....




जिल्ह्यातील दहापैकी नऊ नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी आजसकाळ पासून मतदानाला सुरुवात झाली. सकाळी थोडी थंडी असल्यामुळे मतदान केंद्रावर मतदारांची गर्दी कमी होती मात्र त्यानंतर हळूहळू गर्दी वाढायला सुरुवात झाली.आज लग्नाची दाट तिथी असल्याने अनेक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला व नंतर लग्नसोहळ्याला उपस्थिती लावली. जिल्हातसर्वाधिक मतदान हे चिखलदरा या ठिकाणी हॉट आहे.

## नगरपालिका निवडणुकीत जिल्ह्यात दुपारी मतदानाची गती वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

जिल्ह्यातील दहापैकी नऊ नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उत्साहाने मतदान सुरू असून सकाळी थंडीमुळे मंदावलेली मतदानाची गती दुपारनंतर वाढली. सकाळी ११.३० वाजेपर्यंत २१.३० टक्के मतदानाची नोंद झाली आहे. सर्वाधिक ३०.३४ टक्के मतदान चिखलदरा येथे झाले आहे. या निवडणुकीत मतदार आपल्या मताचा अधिकार बजावून स्थानिक प्रशासन आणि राजकीय नेतृत्व ठरवणार आहेत.



मतदानाच्या टक्केवारीबाबतही उत्सुकता आहे. अचलपूरमध्ये एकूण ९९ हजार ६५९ मतदार असून ११.३० वाजेपर्यंत २१.१७ टक्के, वरूडमध्ये २२.४० टक्के, दर्यापूरमध्ये २१.५० टक्के, मोर्शीत २१.९१ टक्के, चिखलदरा ३०.३४ टक्के, शेंदूरजनाघाट २५.३१ टक्के, चांदूर रेल्वे १६.६५ टक्के, चांदूर बाजार १९.९३ टक्के, धामणगाव रेल्वे २१.०८ टक्के, धारणी १७.८० टक्के आणि नांदगाव खंडेश्वरमध्ये २०.८७ टक्के मतदान झाले आहे. अनेक ठिकाणी मतदारांच्या लांब रागा पाहायला मिळत आहेत. नऊ वर्षांनंतर होत असलेल्या निवडणुकीची उत्सुकता आहे.

या निवडणुकीत भाजप, काँग्रेस आणि शिंदेसेना यांच्यात जोरदार लढाई सुरु असून कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. महायुतीतील भाजप आणि शिंदेसेना हे घटक पक्ष एकमेकांच्या विरोधात दंड थोपटून उभे आहेत. गेले १० दिवस जिल्ह्यातील वातावरण ढवळून निघाले. या निवडणुकीच्या निमित्ताने भाजपच्या पाच आमदारांसह अनेक बड्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.

जिल्ह्यातील अचलपूर, वरूड, मोर्शी, दर्यापूर, चिखलदरा, शेंदूरजनाघाट, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, धामणगाव रेल्वे या नगरपालिका आणि धारणी, नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतींसाठी ही निवडणूक होत आहे.

एकूण ३ लाख १२ हजार ४३६ मतदार ११ अध्यक्ष आणि २४३ सदस्यांना स्थानिक सत्तेची सूत्रे सोपवणार आहेत. यासाठी ६४ उमेदवार अध्यक्षपदासाठी, तर १०४८ उमेदवार नगरसेवकपदांसाठी रिंगणात आहेत.

११ पालिका-नगर पंचायतींच्या १४१ प्रभागांमध्ये एकूण ३६६ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी १२५२ अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मतदानासाठी ५११ कंट्रोल युनिट, ९९७ बॅलेट युनिट आणि ५२४ पॉवर पॅक सज्ज ठेवण्यात आले आहेत. सर्व केंद्रांवर कडक सुरक्षा व्यवस्था असून, अचलपूरमध्ये २९ केंद्रे संवेदनशील घोषित करण्यात आली आहेत. अचलपूरमध्ये शांतता राखण्यासाठी ५०० पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात आहे.राज्य निवडणूक आयोगाने विविध अपिलांवर सुनावणीस झालेल्या विलंबाचे कारण देत, अंजनगाव नगरपालिकेची निवडणूक पुढे ढकलली आहे. अंजनगावसह पाच नगरपालिकांमधील आठ सदस्यपदांची निवडणूक स्थगित करण्यात आली.

## मतदान रद्द; माहिती न दिल्याने मतदार केंद्रावर दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीस केवळ काही तास बाकी असताना निवडणूक आयोगाने निवडणूक पुढे ढकलल्याची घोषणा केली. ही महत्त्वाची माहिती उमेदवारांना निर्णय अधिकाऱ्यांकडून कळविण्यात आली असली, तरी सर्वसामान्य मतदारांना मात्र कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

मुनादी अथवा इतर स्थानिक माध्यमातून घोषणा न झाल्याने अनेक मतदार आज, २ डिसेंबर रोजी, पूर्वनिश्चित तारखेनुसार मतदानासाठी केंद्रावर पोहोचले. मतदान केंद्रावर पोहोचल्यावर निवडणूक पुढे ढकलण्यात आल्याची माहिती मिळाल्याने मतदारांमध्ये संभ्रम व नाराजी व्यक्त करण्यात आली.स्थानिक प्रशासनाकडून मतदारांना वेळेत सूचना न देण्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होत असून मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजीचे वातावरण आहे.

## मतदानाच्या दिवशी राडा, ३ बोगस मतदारांना पकडले
## २ गाड्या भरून लोकांना आणले; काँग्रेसचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२बुलढाणा**

बुलढाणा नगरपालिका निवडणुकीदरम्यान अनेक ठिकाणी बोगस मतदान होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. बुलढाण्यात ३ बोगस मतदारांना पकडले गेले आहेत. बुलढाण्यात बोगस मतदान करण्यासाठी आलेल्या तरुणाला पकडण्यात आले. या तरुणाला मतदान प्रतिनिधींनी चांगलाच चोप दिला. तर काँग्रेसने घाटाखालून २ गाड्या भरून बोगस मतदार आणल्याचा आरोप केला आहे.




बुलढाण्यात बोगस मतदान करण्यासाठी आलेल्या तरुणाला पकडण्यात आले. या तरुणाला पळवून लावण्यात आले. यामुळे शासकीय तांत्रिक विद्यालय मतदान केंद्रावर मोठा गोंधळ उडाला होता. तर बुलढाण्यातील प्रभाग क्रमांक १५ साठी गांधी प्राथमिक शाळा येथे मतदान केंद्र आहे. याठिकाणी दोन बोगस मतदारांना पकडण्यात आले. वैभव देशमुख नामक व्यक्तीच्या नावावर कोथळी ता. मोताळा येथील एका व्यक्तीने मतदान केल्यानंतर पकडण्यात आले.त्याच्यासोबत याठिकाणी आणखी एक जण बोगस मतदान करण्यासाठी आला आहे. कोथळी, इब्राहिमपूर येथून अन्य काही जण बोगस मतदान करण्यासाठी आणले आहेत. दरम्यान घाटा खालून जवळपास दोन गाड्या भरून बुलढाण्यामध्ये बोगस मतदार आणले गेले आहेत. या गंभीर बाबीची दखल पोलिस प्रशासनाने घ्यावी अशी मागणी काँग्रेस, पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

बुलढाण्यात अनेक मतदान केंद्रावर ग्रामीण भागातून बोगस मतदार आणून त्यांच्याकडून मतदान करून घेत असल्याचा आरोप काँग्रेसचे उमेदवार दत्ता काकास यांनी केला आहे. याला पुष्टी करणारे अनेक व्हिडिओही समाज माध्यमात व्हायरल होत आहेत. तर काही मतदारांना बोगस मतदान करताना पकडण्याची माहिती उमेदवारांनी दिली आहे.

## लग्नापूर्वी नवरदेवाचा मतदानाचा संकल्प; लोकशाही उत्सवात धामणगाव रेल्वेचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२धा.रेल्वे**

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे येथे लोकशाहीची जाणीव जपत एक सुंदर उदाहरण समोर आले आहे. अक्षय शिंदे या नवरदेवाने लग्नाच्या बोहल्यावर चढण्यापूर्वी मतदानाचा हक्क बजावत लोकशाहीच्या उत्सवात आपला सहभाग नोंदवला.



धामणगाव रेल्वे येथील नगरपरिषद निवडणुकीसाठी आज मतदान सुरू असताना, अक्षय शिंदे यांचा विवाहसोहळा देखील पार पडत होता. लग्नाची तयारी सुरू असतानाच त्यांनी प्रथम मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले आणि त्यानंतर विवाहाच्या विधींना उपस्थित राहिले.नवरदेवाने बजावलेल्या या कर्तव्यदक्ष कृतीमुळे स्थानिक नागरिकांकडूनही कौतुकाचा वर्षाव होत आहे. अशा जबाबदार मतदानाच्या संदेशामुळे युवकांमध्ये मतदार जागृती वाढण्यास मदत होईल, अशी भावना व्यक्त होत आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853

## अकोल्यात मतदानादरम्यान राडा; पैसे वाटपाच्या संशयावरून कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी, तणावाची परिस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अकोला**

जिल्ह्यातील अकोट नगरपालिकेतील मतदान प्रक्रियेदरम्यान राडा झाला आहे. पैसे वाटपाच्या संशयावरून राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आपसात भिडले. अकोट शहरातील बसस्थानकासमोरील उर्दू शाळेच्या मतदान केंद्राबाहेर मंगळवारी हा सर्व प्रकार घडला. भाजपकडून पैसे वाटप होत असल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र, या घटनेची भाजपचा कुठलाही संबंध नसल्याचे स्पष्टीकरण भाजपकडून देण्यात आले आहे. वंचित व शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून एकाला ताब्यात घेतले. या घटनेमुळे खळबळ उडून काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

जिल्ह्यात नगरपालिका व नगर परिषद निवडणुकीत मतदानाची प्रक्रिया सुरू आहे. या मतदान प्रक्रियेला अकोट येथे गालबोट लागले. मतदान केंद्राबाहेर पैसे वाटप होत असल्याच्या आरोपावरून दोन गटातील कार्यकर्ते आपसात भिडले. यामध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांचा समावेश असल्याची चर्चा होती. मात्र, भाजपने हे आरोप फेटाळले आहेत. अकोटच्या घटनेशी भारतीय जनता पक्षाचा काहीही संबंध नाही. तो भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता नाही. वंचित आणि शिवसेना ठाकरे गटाच्या संघर्षात भाजपचे नाव बदनाम करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप भाजपचे अकोट शहराध्यक्ष हरीश टावरी यांनी केला आहे.

मतदान केंद्राबाहेरच कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाल्याने पोलिसांनी तत्काळ घटनास्थळावर धाव घेतली. परिस्थितीवर नियंत्रण मिळवत गोंधळ घालणाऱ्याला ताब्यात घेतले आहे. अकोट येथे मतदान केंद्राबाहेर पैसे वाटप होत असल्याच्या चर्चेवरून चांगलीच खळबळ उडाली होती. दरम्यान, मतदान केंद्राबाहेर कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारीची चित्रफित समाज माध्यमावर प्रसारित झाली आहे.

## चांदूर रेल्वेत सरकारी कार्यालयात पैसे वाटपाचा आरोप
## वंचित युवा आघाडी आक्रमक, चौकशीचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अमरावतीच्या चांदूर रेल्वे येथे उमेद नगरपरिषद क्षेत्रातील एका शासकीय कार्यालयात भाजपकडून पैसे वाटत असल्याचा गंभीर आरोप वंचित युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष निलेश विश्वकर्मा यांनी केला आहे. या प्रकारामुळे स्थानिक स्तरावर खळबळ उडाली असून विश्वकर्मा यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यावर तीव्र टीका केली आहे.

निलेश विश्वकर्मा यांनी निवडणुकीच्या तोंडावर प्रशासनाने निष्पक्षता राखली पाहिजे, असे सांगत पैसे वाटप करणाऱ्या संबंधितांवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर पावले उचलली जावीत, अशी त्यांची भूमिका आहे.

या आरोपांवर प्रतिक्रिया देताना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सांगितले की, या संदर्भात आम्ही चौकशीचे आदेश निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिले आहेत. चौकशी झाल्यानंतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

या प्रकरणामुळे चांदूर रेल्वे परिसरात राजकीय वातावरण तापले असून संपूर्ण घटनेवर सर्वपक्षीयांचे लक्ष केंद्रीत झाले आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत